cmyk

## संपादकीय

### मुंबईला वायू प्रदूषणाचा विळखा

हिवाळा ऋतू सर्वांना हवा हवासा वाटत असला तरी या ऋतूमधील डिसेंबर आणि जानेवारी महिने हवेतील प्रदूषणाला प्रचंड प्रमाणात पोषक असतात. सतत विविध प्रकारची कामे सुरू असलेल्या ठाणे, मुंबईसारख्या शहरांमधील हवेत धुळीचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. थंड हवेमुळे वातावरणातील धूळ वर न जाता ती काही फुटांच्या अंतरावर तरंगत राहते. अशा धुळयुक्त हवेचा मानवावर, प्राण्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका असतो. त्यामुळे धुळीसोबतच हवेतील सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड आणि इतर विषारी घटकांचे प्रमाण वाढते. देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये सध्या हेच चित्र पाहायला मिळत आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com








बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२५० | गुरूवार, दि.२ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


# शेतकऱ्यांसाठी मोदी कॅबिनेटचे गिफ्ट

## पीएम पीक योजनेत मोठी अपडेट, डीएपीवर अतिरिक्त सबसिडी



**नवी दिल्ली । वृत्तसस्था**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी कॅबिनेट बैठक झाली. त्यात नवीन वर्षात शेतकऱ्यांसाठी मोठे गिफ्ट देण्यात आले. बैठकीत पीएम पीक योजनेतील अपडेट समोर आली आहे. शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार आहे. तसेच डीएपीच्या सबसिडीबाबत सुध्दा मोठा निर्णय घेण्यात आला आहे.**

### पीक विमा योजना वाटपात वाढ

केंद्रीय मंत्रिमंडळाने प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामान आधारीत पीक विमा योजना २०२५-२६ पर्यंत सुरू ठेवण्यास मंजूरी दिली आहे. त्यासाठी २०२१-२२ ते २०२५-२६ पर्यंत ६९,५१५.७१ कोटी रुपयांचा खर्चास मंजूरी देण्यात आली. या निर्णयामुळे २०२५-२६ पर्यंत देशभरातील शेतकऱ्यांना पीक विमातंर्गत जोखीम संरक्षण मिळेल. तर योजनेत आता तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने पारदर्शकता आणि दावा निपटाऱ्यांचे प्रमाण झटपट करण्यात येईल. याशिवाय केंद्रीय मंत्रिमंडळाने ८२४.७७ कोटींसह इनोव्हेशन अँड टेक्नॉलॉजी फंड तयार करण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे. त्यामुळे या क्षेत्रात संशोधनाला आणि विकासाला चालना मिळेल.

### डीएपीवर अतिरिक्त विशेष पॅकेजची घोषणा

कॅबिनेटच्या बैठकीत शेतकऱ्यांसाठी अनेक पाऊलं टाकण्यात आली आहेत. स्वस्त डीएपी खत शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अतिरिक्त अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तर एनबीएस सबसिडी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. डाय-अमोनियम फॉस्फेटवर एक रक्कमी ३,५०० रुपये प्रति मॅट्रिक टनाच्या प्रस्तावाला पुढील आदेशापर्यंत मंजूरी देण्यात आली आहे. डाय-अमोनियम फॉस्फेटवर अतिरिक्त अनुदान देण्यात येणार आहे. डीएपीची ५० किलोची बॅग शेतकऱ्यांना १३५० रुपयांना मिळेल. एका बॅगची किंमत जवळपास ३ हजार रुपये इतकी आहे.

पीएम पीक योजनेतील मोठी अपडेट समोर येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेटच्या बैठकीत शेतकऱ्यांसाठी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. आता पीएम पीक योजनेचे वाटप ६९५१५ कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला. रक्कमेत सरकारने मोठी वाढ केली आहे. तर तंत्रज्ञाना आधारे शेतकऱ्यांच्या दावांच्या लवकर निपटारा करण्यात येणार आहे. यासह डाय-अमोनियम फॉस्फेट वर अतिरिक्त अनुदान देण्यात येणार आहे. डीएपीची ५० किलोची बॅग शेतकऱ्यांना पान २ वर

## वाल्मिक कराडपेक्षाही हे ६ जण खतरनाक

### गंभीर गुन्हे तरीही मोकाटच; परिसरात कायम असायची दहशत

**बीड । प्रतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात फरार असलेल्या आरोपींची वयं ही २२ ते २७ वर्षादरम्यान असली तरी त्यांची क्राइम रेकॉर्ड पाहून तुम्हाला धक्का बसल्याशिवाय राहणार नाही. वाल्मिक कराड पेक्षाही हे ६ जण खतरनाक असल्याचे त्यांच्या गुन्ह्याच्या रेकॉर्डवरुन दिसत आहे. गुन्हे जास्त असल्याने या गुन्हेगारांची त्यांच्या परिसरात नेहमीच दहशत होती.**

बीडमधील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणापासून चर्चेत असलेल्या वाल्मिक कराडला अटक करण्यात आली आहे. खंडणीप्रकरणात वाल्मिक कराडला अटक करण्यात आली असून तोच सरपंच हत्येमधील प्रमुख सूत्रधार असल्याचा विरोधीपक्षाच्या नेत्यांचा आरोप आहे. अटकेनंतर वाल्मिक कराड काहीही न पान २ वर

**सुदर्शन घुले (वय २६)**
एकट्या केजमध्येच ८ गुन्हे दाखल
मारहाण, चोरीपासून ते गंभीर गुन्ह्यांचा समावेश
१० वर्षात १० मोठे गुन्हे दाखल

**कृष्णा आंधळे (वय २७)**
४ वर्षामध्ये ६ गंभीर गुन्हे दाखल
खुनाच्या प्रयत्नाचाही गुन्हा दाखल

**महेश केदार (वय २१)**
पाच गुन्हे दाखल

**प्रतिक घुले (वय २४)**
७ वर्षामध्ये पाच गुन्हे दाखल
अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद

**सुधीर सांगळे (वय २२)**
दोन कोटींची खंडणी मागितली
संतोष देशमुखांच्या हत्येत सहभाग

**विष्णू चाटे**
कंपनीकडून मागितली खंडणी
संतोष देशमुख प्रकरणात सहभाग

# एसआयटी गठीत; सत्य येणार बाहेर

## संतोष देशमुख खून प्रकरण: समितीत १० जणांचा समावेश



**मुंबई । पतिनिधी**

**सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटीची स्थापना केली आहे. सरकारने १० जणांची एसआयटी गठीत करण्यात आली आहे. सरकारने याबाबत जीआर काढून घोषणा केली आहे. एसआयटी स्थापन झाल्याने या घटनेतील सत्य बाहेर येण्याची दाट शक्यता आहे.**

बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सरकारने एक महत्त्वाचं पाऊल उचललं आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी राज्य सरकारने एसआयटीची समिती स्थापन केली आहे. या समितीत १० पोलीस अधिकारी आहेत. आयपीएस बसवराज तेली यांच्या नेतृत्वात एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. बसवराज तेली सीआयडीमधील आर्थिक गुन्हे शाखेचे प्रमुख आहेत. एसआयटीमध्ये सर्वच अधिकारी बीड जिल्ह्यातले आहेत. सध्याचे तपास अधिकारी डीवायएसपी अनिल गुजर हेही तपास पथकात असणार आहेत.

### एसआयटीमध्ये कोण कोण?

डॉ.बसवराज तेली, समितीचे अध्यक्ष(आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपमहानिरीक्षक ), अनिल गुजर, पोलीस उप अधीक्षक, विजयसिंग शिवलाल जोनवाल, स. पो. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड, महेश विघ्ने, पो. उ. निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, बीड, आनंद शंकर शिंदे, पो. उ. निरीक्षक, केज, तुळशीराम जगताप, सहा. पो. उ.निरीक्षक, मनोज राजेंद्र वाघ, पोलीस हवालदार, चंद्रकांत एस. काळकुटे, पोलीस नाईक, बाळासाहेब देविदास अहंकारे, पोलीस नाईक, संतोष भगवानराव गित्ते, पोलीस शिपाई

### जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई होईल–पटेल

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावर प्रफुल्ल पटेल यांनी प्रतिक्रिया दिली. बीड प्रकरण अत्यंत दुःखदायी असून गंभीर आहे. जे झालं त्यामुळे सगळेच नाराज आहेत. या प्रकरणात मुख्यमंत्री स्वतः लक्ष घालून आहेत. त्यांनी दोषींवर कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्रामध्ये असे प्रकार घडू नये यासाठी सुद्धा प्रयत्न सुरू आहेत. यात जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कडक कारवाई करण्यात येईल. त्यात कुणालाही सोडणार नाही, असे प्रफुल्ल पटेल म्हणाले.

### घटनेला मराठा विरुध्द वंजारी रंग दिला– आंबेडकर



संतोष देशमुख खून प्रकरणानंतर मराठा विरुध्द वंजारी असा रंग दिला गेला. सरकारने याबाबत आधीच काळजी घ्यायला हवी होती, अशी प्रतिक्रिया प्रकाश आंबडेकर यांनी व्यक्त केले आहे. त्यामुळे आज सामाजिक वातावरण खराब झाले असल्याचे ते म्हणाले.

### मंत्री दत्ता भरणेंकडून मुंडेंची पाठराखण



कार्यकर्त्याने गुन्हा केला तर त्यात नेत्याचा सहभाग असतोच असे नाही, त्यामुळे धनंजय मुंडे यांना दोषी धरणे चुकीचे होईल, असे मत मंत्री दत्ता भरणे यांनी व्यक्त केले आहे.

## आश्वासनानंतर सामूहिक जलसमाधी आंदोलन मागे

### फरार आरोपींना तातडीने अटक करा; महिलांचाही समावेश



बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांच्या अटकेसाठी मस्साजोगचे ग्रामस्थ आक्रमक झाले आहे. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करण्यात यावी, या मागणीसाठी मस्साजोगच्या ग्रामस्थांकडून सामूहिक जलसमाधी आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांनी देखील सहभाग घेतल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आंदोलकांनी घोषणाबाजीही केली. पोलिस अधिक्षक नवणीत काँवत हे आंदोलनस्थळी आल्यावर त्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेतले. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील फरार आरोपी, मारेकऱ्यांना तात्काळ अटक करा आणि त्यांना फाशीची शिक्षा द्या, अशी एकच मागणी मस्साजोगच्या ग्रामस्थांची आहे. यासह पोलीस निरीक्षक पान २ वर

#### फरार आरोपींना १० दिवसात पकडू–काँवत

आंदोलनस्थळी पोलिस अधिक्षक नवणीत काँवत यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. त्यांच्या मागण्या समजून घेतल्यावर फरार आरोपींना १० दिवसात पकडू, असे आश्वासन पोलिस अधिक्षकांनी दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले.

#### १० दिवसात पकडा, अन्यथा आम्हाला गोळ्या घाला

जलसमाधी आंदोलनादरम्यान पोलिस अधिक्षकांसमोर गावकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला. १० दिवसात फरार आरोपींना पकडा अन्यथा आम्हाला गोळ्या घाला, असे ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

## वाल्मिक कराड याची प्रकृती बिघडली?

### ऑक्सिजन लावून जेवन न करताच झोपले



**बीड: न्यायालयाने वाल्मिकी कराड याला १५ दिवसांची सीआयडी कोठडी दिली. बुधवारी रात्री दीड वाजता केज न्यायालयातून बीड शहर पोलीस ठाण्यात त्याला आणण्यात आले होते. त्यानंतर त्याची प्रकृती बिघडली. जेवन न करताच तो ऑक्सिजन लावून झोपला असल्याचे समजते.**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड मंगळवारी पुणे सीआयडीला शरण आला. त्यानंतर त्याला अटक करुन बीड जिल्ह्यातील केज न्यायालयात मंगळवारी रात्री आणण्यात पान २ वर

#### बीड शहर ठाण्यात चौकशी

सीआयडीचे एसपी बीड शहर पोलीस ठाण्यात चौकशीसाठी दाखल झाल्यावर त्या ठिकाणी चौकशी झाल्याचे समजते. वाल्मिक कराड याचा सीआयडी कोठडीचा आज पहिला दिवस आहे.

#### सुदर्शन घुले आता सिआयडीच्या रडारवर

वाल्मिक कराड यास अटक केल्यावर आता सीआयडीच्या रडारवर सुदर्शन घुले असल्याचे समजते. त्याचे मुळगाव घुल्याची टाकळी या गावात जावून सिआयडीने चौकशी केली. घुले हा महाराष्ट्रातच असल्याची माहिती समोर येत असून इतर दोन आरोपी राज्याबाहेर असल्याचे म्हटले जात आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१ जानेवारी २०२५**


आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.५० क्विंटल | २,५०० | २,६०१ | २,५५० |
| ज्वारी/हायब्रिड: ५७.५० क्विंटल | १,९०० | २,७०० | २,१६७ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ७४.५० क्विंटल | ५,५०० | ७,५०० | ७,००० |
| उडीद : ३७.५० क्विंटल | ४,५०० | ६,८०१ | ६,४०२ |
| बाजरी: ८.५० क्विंटल | २,३५१ | ४,१०० | २,७८० |
| मुग : २.०० क्विंटल | ६,००१ | ७,००१ | ६,५०१ |
| सोयाबीन: १४४.५० क्विंटल | ३,६०० | ४,१४१ | ४,०४७ |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# शरद पवार आणि अजित पवार एकत्र येणार?

## प्रफुल्ल पटेल यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण





**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन वळण येण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या मातोश्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांची वक्तव्ये शरद आणि अजित पवार यांच्या पुन्हा एकत्र येण्याची शक्यता निर्माण करत आहेत. विशेष म्हणजे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनीदेखील तसंच मोठे वक्तव्य केले आहे. त्यामुळे आगामी काळात काय घडते? ते पाहणे महत्त्वाचे आहे.**

महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात कदाचित ट्विस्ट येण्याची शक्यता आहे. कारण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पान २ वर

### माझ्या छातीत शरद पवार–झिरवाळ



मुंबई-पहाटे शपथ झाली तेव्हा मी दिल्लीला पळून गेलो अशी माझ्यावर टीका झाली. त्यावेळी मी सांगितले होते की, बजरंगाच्या छातीत प्रभू श्री राम दिसले होते. तशी माझी छाती फाडली तर शरद पवार साहेबच दिसतील. ते पुढे असेही म्हणाले, मी ज्या दिवशी अजितदादांसोबत गेलो, त्यानंतर शरद पवार यांच्यासमोर गेलो नाही. कोणत्या तोंडाने मी साहेबांपुढे जाऊ? मी साहेबांना प्रभू रामाच्या जवळचे स्थान देतो. प्रभू रामचंद्राच नाव घेऊन मी साहेबांना फसवले. मला हा निर्णय घ्यायला भाग पडले, याच मूल्यांकन मीच करू शकतो. आता पवारसाहेबांकडे जाऊन लोटांगण घालून पाया पडणार असल्याचेही झिरवाळ म्हणाले.

## बा पांडुरंगा, हा इस्कोट मिटू दे..!

### पवार कुटुंब गुण्यागोविंदाने नांदू दे, अजितदादांच्या आईचे विठ्ठोबाला साकडे

पंढरपुर : राष्ट्रवादी पक्ष फुटल्यानंतर अजित पवार आणि शरद पवार या दोघांमध्ये कौटुंबिक पातळीवर सुद्धा संबंध ताणल्याचे दिसून आले. सरत्या वर्षात १२ डिसेंबर रोजी अजितदादांनी शरद पवार यांना थेट भेट घेत शुभेच्छा दिल्याने सर्वांचा भुवया उंचावल्या होत्या. आता अजितदादांच्या आईने विठ्ठलाला साकडे घालून पवार कुटुंब गुण्यागोविंदाने नांदू दे, अशी मागणी केली आहे. बा पांडुरंगा, हा इस्कोट मिटू दे, असे त्या देवापुढे म्हणाल्या आहेत.

बारामतीच्या सत्ता वर्तुळात गेल्या दोन वर्षात मोठ्या घाडामोडी घडल्या. थोरले पवार आणि अजितदादांचे ताणलेले संबंधी सर्वांनी जवळून पाहिले. लोकसभा-विधानसभेतील चुरस उभ्या भारताने अनुभवली. राजकारणाचे परिणाम कुटुंब-कबिल्यावर दिसून आले. पण १२ डिसेंबर रोजी शरद पवार यांच्या पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मुंबईला वायू प्रदूषणाचा विळखा

हिवाळा ऋतू सर्वांना हवा हवासा वाटत असला तरी या ऋतूमधील डिसेंबर आणि जानेवारी महिने हवेतील प्रदूषणाला प्रचंड प्रमाणात पोषक असतात. सतत विविध प्रकारची कामे सुरू असलेल्या ठाणे, मुंबईसारख्या शहरांमधील हवेत धुळीचे प्रमाण जास्त प्रमाणात आढळून येते. थंड हवेमुळे वातावरणातील धूळ वर न जाता ती काही फुटांच्या अंतरावर तरंगत राहते. अशा धुळयुक्त हवेचा मानवावर, प्राण्यांवर विपरीत परिणाम होण्याचा धोका असतो. त्यामुळे धुळीसोबतच हवेतील सल्फर डायऑक्साईड, नायट्रॉजन ऑक्साईड आणि इतर विषारी घटकांचे प्रमाण वाढते. देशाच्या आर्थिक राजधानीमध्ये सध्या हेच चित्र पाहायला मिळत आहे. मुंबईनगरीत वायू प्रदूषणाने इतके टोक गाठले आहे की, सध्याची प्रदूषणाची पातळी ही दिवसाला साडेतीन किंवा महिन्याला १०५ सिगारेटच्या धुराइतकी आहे. वाढत्या वायू प्रदूषणामुळे गेले काही दिवस मुंबईतील काही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात धुरके दिसून येत आहे. हवा विषारी तर झाली आहेच; पण मुंबईचाही श्वास कोंडला आहे. परिस्थिती अशी आहे की, सततच्या प्रदूषणामुळे निर्माण झालेल्या विषारी धुरक्यामुळे रस्त्यांची दृश्यमानता कमी झाली आहे. शहरातील दृश्यमानता दोनशे ते तीनशे मीटर इतकी कमी झाली होती, त्यामुळे जवळपासच्या गगनचुंबी इमारतीही क्वचितच दिसत होत्या. सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे धुक्यामुळे गेल्या शुक्रवारी दिवसभर सूर्यदेवाचे दर्शनही झाले नाही.

मुंबई शहर आणि उपनगरातील प्रमुख ५ ठिकाणी हवा प्रचंड दूषित आहे. याशिवाय १० ठिकाणची हवा आरोग्यास घातक आहे. हवा गुणवत्ता निर्देशांकाच्या (एक्यूआय) संकेतस्थळावरील माहितीनुसार, काल मालाड, माझगाव, नेव्हीनगर कुलाबा, सिद्धार्थनगर, वरळी आणि वांद्रे-कुर्ला संकुल-बीकेसी येथील एक्यूआय तीनशे पार गेला आहे. या ठिकाणी प्रदूषणाची पातळी अति खराब कॅटेगरीमध्ये नोंदली गेली आहे. या प्रमुख ठिकाणांसह तब्बल ठिकाणची हवा गुणवत्ता निर्देशांक २०० ते ३०० एक्यूआय दरम्यान आहे. ही पातळी आरोग्यास अपायकारक हवेच्या कॅटेगरीमध्ये मोडते. यात वांद्रे-पूर्व, बोरिवली-पूर्व, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, देवनार, जुहू, भांडूप-पश्चिम, अमेरिकन वकिलाती कार्यालय-बीकेसी, नेरूळ, सायन, विलेपार्ले आदी ठिकाणांचा समावेश आहे. कमाल तापमानामध्ये घट झाल्याने हवेतील आर्द्रता वाढत आहे. त्यामुळे वातावरणातील धुळीचे कण त्याच स्थितीत राहतात. समुद्रातून येणाऱ्या वाऱ्यांमुळे हवेतील आर्द्रता वाढत असल्याचे हवामान खात्याचे म्हणणे आहे. हा आठवडाभर हीच स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. मुंबईतील वाढत्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात सुरू असलेली पायाभूत सुविधांची कामे, अनियंत्रित वाहतूक व्यवस्था आदी कारणीभूत आहेत. मुंबईत सध्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या निर्मितीची कामे सुरू आहे. त्यात मेट्रो आणि कोस्टल रोडच्या कामाचाही समावेश आहे. याशिवाय दर अर्ध्या किलोमीटरवर गगनचुंबी इमारतीचे बांधकाम सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी बांधकाम सुरू असताना आणि जुने बांधकाम पाडताना प्रचंड धुळ उडते. तोडकाम करताना सदर जागेसभोवती हिरवा कपडासभोवती बांधण्याच्या सूचना महापालिकेकडून देण्यात आलेल्या आहेत. मात्र फार कमी लोकांकडून त्याची अंमलबजावणी होते. मागील काही दिवसांमध्ये महापालिकेने अशा जवळपास ९०० बांधकाम ठिकाणांची पाहणी करून नियम मोडणाऱ्या २८ विकासकांवर कारवाई केली आहे.

उघड्यावर डेब्रिज वाहून नेणाऱ्या वाहनांवर महापालिकेने महिनाभरात मोठी कारवाई करताना जवळपास १२ लाख रुपयांचा दंडही वसूल केला आहे. मुंबईत २५० पेक्षा अधिक स्मशानभूमी आहेत. यातील बहुतांश स्मशानभूमीमध्ये अजूनही लाकडांचा वापर केला जातो. या धुरामुळे प्रदूषणात वाढ होत असल्याने लाकूड आधारित ४१ स्मशानभूमींचे इलेक्ट्रिक किंवा पीएनजी आधारित दहनभूमीत रूपांतरण करण्यात येत आहे. भविष्यात अधिकाधिक स्मशानभूमींचे अशाप्रकारे रूपांतरण करण्याचा पालिकेचा मानस आहे. मुंबईत सध्या १२ लाखांपेक्षा जास्त खासगी कार आहेत. त्यामुळे रस्त्यांवर वाहतूक नेहमी ठप्प झालेली दिसून येते. इच्छित स्थळी जाण्यासाठी दुप्पट वेळ लागत आहे. रस्त्यावर सतत धावणाऱ्या वाहनांमुळे प्रदूषणाची पातळी वाढत आहे. अनियंत्रित वाहतूक व्यवस्थेचाही थेट परिणाम प्रदूषण वाढीवर होत आहे. समुद्रातील तापमानात घट, उंच इमारतींमुळे हवेचा बदललेला पॅटर्नही वायू प्रदूषणाला खतपाणी घालत आहे. गगनचुंबी इमारती समुद्रातील वाऱ्यांना त्यांचे काम करू देत नाहीत. ऑक्टोबर हिट आणि मान्सून परतण्यास लागलेला उशीर हेही एक कारण आहे. थंडीचे कमी-अधिक प्रमाण तसेच वाढते प्रदूषण पाहता श्वसनाशी संबंधित रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांसह महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना होत आहे. थंडीपासून दूर राहण्यासाठी उबदार कपडे घालावेत. शक्य असल्यास थंड हवामान टाळा.

थंड पदार्थांचे सेवन मर्यादित असावे. विशेषतः कोणत्याही आजाराची लक्षणे दिसू लागल्यास न डगमगता तातडीने महापालिकेच्या किंवा खासगी रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे महापालिकेतर्फे सांगण्यात आले आहे. राजधानी दिल्लीप्रमाणे मुंबईची हवा प्रदूषित होऊ नये यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सतर्क आहे. हवेमधील प्रदूषणाचे प्रमाण ओळखून त्यावर त्वरित उपाययोजना करण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने निरंतर हवा तपासणी यंत्र बसवले आहेत. याशिवाय मुंबई महापालिकेकडून रस्ते पाण्याने धुऊन काढले जात आहेत. प्रदूषण रोखण्यासाठी पालिकेकडून हरतरेचे प्रयत्न केले जात असले तरी नियम मोडणाऱ्यांविरोधात आणखी कडक कारवाई करण्याची गरज आहे.

# महाराष्ट्राचे पहिले एआय धोरण तयार करा-मंत्री ॲड.शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे, यासाठी राज्याचे पहिले एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी विभागाला दिले.**

एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग, व्यवसाय उभे राहतील. तरुणांना रोजगार मिळेल व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करु शकेल, असे त्यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृहावर माहिती तंत्रज्ञान विभागाचा मंत्री ॲड.शेलार यांनी आढावा घेतला. या बैठकीस आयटी विभागाचे सचिव पराग जैन नैनुटिया, महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. विभागाचा आढावा घेत अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करताना मंत्री ॲड.शेलार म्हणाले की, एआय तंत्रज्ञानाचे युग सुरू झाले आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राचे स्थान भक्कम करण्याची ही संधी आहे. मार्च २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत देशभरात एआय क्षमता वाढवण्यासाठी ₹१०,३७२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात इंडिया एआय डेटासेट्स प्लॅटफॉर्म, ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट प्रकल्प, ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स, इंडिया एआय इनोव्हेशन सेंटर, फ्युचर स्किल्स प्रोग्राम आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा यांचा समावेश आहे.

# महायुतीच्या ९ मंत्र्यांनी अद्याप पदभार स्वीकरलाच नाही

**मुंबई । प्रतिनिधी**

**महायुतीत कोणाला कोणती खाती द्यायची? आणि कोणाला मंत्री करायचे? यावरूनही एकमत नसल्यामुळे मंत्रिमंडळ विस्तार आणि शपथविधी लांबणीवर गेल्याची चर्चा होते. मात्र आता मंत्रिपद खातेवाटप झाल्यानंतरही महायुतीच्या नऊ मंत्र्यांनी अद्याप पदभार स्वीकारला नसल्याची माहिती समोर येत आहे.**

सहा कॅबिनेट तर तीन राज्यमंत्र्यांनी पदभार अद्यापही स्वीकारलेला नाही. मंत्र्यांच्या शपथविधीला आतापर्यंत १७ दिवस पूर्ण झालेत आणि या १७ दिवसानंतर सुद्धा नऊ मंत्र्यांनी पदभार स्वीकारलेला नसल्याचे दिसत आहे. तर महायुतीच्या नऊ मंत्र्यांनी अद्याप का पदभार स्वीकारला नाही, याचे कारण अद्याप समोर आले नाही. महायुती सरकारच्या ज्या नऊ मंत्र्यांनी अद्याप त्यांना मिळालेल्या खात्याचा पदभार स्वीकारला नाही, त्या मंत्र्यांमध्ये दुग्ध विकास मंत्री अतुल सावे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी अद्याप पदभार स्वीकारलेला नाही. तर रोजगार हमी मंत्री भरत गोगावले, सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, क्रीडा आणि अल्पसंख्यांक मंत्री दत्ता भरणे यांनी अद्यापही पदभार स्वीकारला नाहीये मंत्रीपदाचा. तर सामाजिक न्याय आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ, अर्थ आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जायस्वाल, गृहखाते राज्यमंत्री योगेश कदम यांनी अद्यापही पदभार स्वीकारलेला नाही.

# आणखी एका सरपंचाचे अपहरण

## पायात कुलूप असताना पिडीत पोहचले थेट एसपी कार्यालयात

**बीड । प्रतिनिधी**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. या प्रकरणातील चार आरोपींना अटक करण्यात आली असून अद्याप तीन आरोपी फरार आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता बीड जिल्ह्यात पुन्हा एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आणखी एका सरपंचाचे अपहरण करण्यात आल्याची माहिती समोर आले आहे.**

बीडमधील एका माजी सरपंच पायात कुलूप घातलेल्या अवस्थेत पोलीस अधीक्षक कार्यालयात दाखल झाला आहे. ज्ञानेश्वर इंगळे माजी सरपंचाचे नाव आहे. ते केज तालुक्यातील कळंब अंबा येथील रहिवासी आहेत. पंकजा मुंडे यांच्याकडून फंड देतो म्हणून केजमधून मुंबईला जायचे म्हणून गाडीत बसवले. पाटोदा येथे गेल्यानंतर तीन लाख रुपये काढून घेत एका खोलीत हात आणि पाय बांधून डाबून ठेवले. कशीतरी सुटका करून धावत पळून आलो, असे पीडित सरपंचाने सांगितले. या घटनेमुळे पुन्हा एकदा जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला शिधापत्रिकाधारकांना गिफ्ट

# एपीएल धारकांच्या खात्यात २ कोटी ४१ लाख ४१ हजार जमा

## उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी केवायसी करून घ्यावी- आ.संदीप क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**नववर्षाच्या पूर्वसंध्येला बीड तालुक्यातील एपीएल रेशन कार्डधारकांना नवीन वर्षाचे गिफ्ट मिळाले आहे. दि.३१ डिसेंबर रोजीच्या संध्याकाळी एपीएल कार्ड धारकांच्या खात्यात २ कोटी ४१ लाख ४१ हजार एकसष्ठ हजार रूपये जमा झाले आहेत. उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी लवकरात बँक केवायसी करून घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.**

बीड तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत . १९०६६ एपीएल शेतकऱ्यापैकी ५८०० शिधापत्रिकाधारक यांना एपीएल डीबीटी द्वारे रोख रक्कम प्राप्त झाली असून त्यापैकी ३७८२ लाभार्थी यांच्या खात्यात प्रतिव्यक्ती १७० प्रमाणे २ कोटी ४१ लाख ४१ हजार ६१ रूपये महिला कुटुंब प्रमुखांच्या खात्यात नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला जमा झाले आहेत. उर्वरित २०१८ शेतकरी लाभार्थी यांनी बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे उर्वरित शिधापत्रिकाधारकांनी बँक केवायसी करून घ्यावी. तसेच ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही त्या शिधापत्रिका धारक यांनी आपल्या कुटुंबातील महिलेचे बँक पासबुक, आधार कार्ड व कुटुंबातील



कोणत्याही व्यक्तीचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा असे असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. यासोबतच सध्या पीएचएच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन ई-केवायसी करावी. ही सुविधा निशुल्क उपलब्ध आहे. त्यासाठी कोणताही खर्च आकारण्यात येत नाही. याबद्दल तहसिल कार्यालयाकडून बीड तालुक्यातील एकूण ३४८ स्वस्त धान्य दुकानदार यांना सूचित करण्यात आले आहे. दरम्यान ई-केवायसी करताना नागरिकांना कसल्याही प्रकारची अडचण होऊ नये, आर्थिक मागणी केली जाऊ नये व नागरिकांची गैरसोय होऊ नये अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार व संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# नववर्षारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोलीत

**गडचिरोली । प्रतिनिधी**

**नवीन वर्षाचा पहिला दिवस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोली जिल्ह्यात व्यतित केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा अशी बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला आणि त्या बसमधून प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६२०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होते आहे.**

आज सकाळी गडचिरोली जिल्ह्यात आगमन झाल्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट ताडगुडा ब्रीज येथे गेले. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे त्यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे त्यांनी जवानांशी आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. हा परिसर अतिदुर्गम मानला जातो. थेट मुख्यमंत्र्यांनी त्याठिकाणी जात एक वेगळा संदेश दिला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री आहेत. त्यानंतर दुपारी कोनसरी येथे, लॉईड्सच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यात कोनसरी येथे डीआयआय प्लांट (४०० कोटी रुपये गुंतवणूक, ७०० रोजगार), पेलेट प्लांट आणि स्लरी पाईपलाईन (३००० कोटी रुपये गुंतवणूक, १००० रोजगार), हेडरी, एटापल्ली येथे आयर्न ओअर ग्राईडिंग प्लांट (२७०० कोटी रुपये गुंतवणूक, १५०० रोजगार), वन्या गारमेंट युनिट (२० कोटी रुपये गुंतवणूक, ६०० रोजगार) याचा समावेश आहे. शिवाय लॉईडस काली अम्मल हॉस्पीटल आणि लॉईडस राज विद्यानिकेतन सीबीएसई शाळेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. सुमारे १२०० विद्यार्थ्यांना येथे शिक्षण मिळणार आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने, जिमखाना, बालोद्यान इत्यादींचेही लोकार्पण करण्यात आले. कामगार आणि पूर्वाश्रमीच्या नक्षलवाद्यांना कंपनीचे १००० कोटींचे शेअर्स प्रदान करुन एकप्रकारे मालकी देण्याचाही स्तुत्य उपक्रम लॉईड्सने हाती घेतला. हे शेअर्स मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

गडचिरोलीत ग्रीन माईनिंगचाही शुभारंभ करण्यात आला. यातून खाणींचे संरक्षण होणार असून लोहखनिजासाठी स्लरी पाईपलाईनमुळे इंधनबचत होणार, कार्बन उत्सर्जन कमी होणार, रस्त्यावरील अपघातही कमी होणार आहेत. ग्रीन माईनिंगचा प्रयोग गडचिरोलीत प्रथमच राबविण्यात येत आहे. गोंडवाना विद्यापीठ ऑस्ट्रेलियन विद्यापीठाशी एक करार करणार असून, त्यातून मायनिंगशी संबंधित सर्व अभ्यासक्रम सुरु करण्यात येतील. यातून गडचिरोलीतील तरुणांनाच रोजगार मिळणार आहे, अशीही माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ११ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. यात ८ महिला आणि ३ पुरुष आहेत. यात दोन दाम्पत्य आहेत. या ११ जणांवर महाराष्ट्रात १ कोटींपेक्षा अधिकचे बक्षीस होते. छत्तीसगड सरकारने सुद्धा त्यांच्यावर बक्षिस जाहीर केले होते. यात दंडकारण्य झोनल कमिटीच्या प्रमुख आणि भूपतीची पत्नी ताराक्का आहेत. ३४ वर्षांपासून त्या नक्षली चळवळीत आहेत. ३ डिव्हिजन किमिटी मेंबर तर १ उपकमांडर, २ एरिया कमिटी मेंबर आहेत. या सर्वांना पुढचे जीवन जगण्यासाठी ८६ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली. निवडणूक आचारसंहितेच्या काळात ५ नक्षली ठार झाले.

# शिवाजी महाविद्यालयात रक्तदान शिबिर

**हिंगोली । प्रतिनिधी**

हिंगोली- येथील शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन वर्षानिमित्त व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक पूर्व शिक्षणाधिकारी मा. शिवाजीराव पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. शिवाजीराव पवार यांचा सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. किशोर इंगोले म्हणाले की, समाजाचे उत्तरदायित्व म्हणून आपण सर्वांनी नियमित रक्तदान केले पाहिजे. रक्ताच्या पिशवीला ठराविक मुद्दत असते रक्ताचा तुटवडा असो किंवा नसो असाध्य रोगावर किंवा ठराविक व्याधींसाठी ताजे रक्त व पेशी आवश्यक असतात. हंगामी विषाणूजन्य आजार, चक्रीवादळासारख्या हवामान चलित आपत्ती,




वातावरणातील बदल, आजारांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे रक्ताचा तुटवडा दूर करता येतो. यावेळी २७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या विचारमंचवर मा. शिवाजीराव पवार, संस्थेच्या अध्यक्षा सौ. मंदाताई पवार, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. प्रल्हाद शिंदे, संस्थेचे सहसचिव श्री प्रणव पवार, संस्थेचे सदस्य श्री प्रभाकर पारीसकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, रक्त संकलन अधिकारी डॉ. स्वाती गुंडेवार, श्री सी जे लोंढे, विद्यार्थी विकास विभाग प्रमुख डॉ. सुनील कांबळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. आशिष इंगळे मुख्याध्यापक श्री रतन भोपाळे, प्रा. देवानंद येवले, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या अधीक्षक श्रीमती प्रतिभा पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धाराशिव शिराळे तर आभार प्रदर्शन प्रा. संजय चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाला शिक्षकवृंद, प्राध्यापक वृंद, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांसाठी मोदी

१३५० रुपयांना मिळेल. एका बॅगची किंमत जवळपास ३ हजार रुपये इतकी आहे. ती अर्ध्याहून कमी किंमतीत शेतकऱ्यांना देण्यात येईल. जागतिक बाजारात डीएपीच्या किंमतीत कितीही चढउताराचे सत्र आले तरी त्याचा कोणताही परिणाम शेतकऱ्यांवर होणार नाही.

----------

### वाल्मिक कराडपेक्षाही

बोलताना हात जोडत निघून गेला. मात्र आता वाल्मिक कराडच्या अटकेनंतर सीआयडी आणि इतर तपास यंत्रणा संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये अन्य फरार आरोपींच्या शोधात आहेत. हे आरोपी कोण आहेत आणि त्यांच्यावर कोणते गुन्हे दाखल आहेत. वाल्मिक कराड पेक्षाही या सहा गुन्हेगारांची त्या त्या भागात मोठी दहशत होती. तर हे सर्वच कराड पेक्षाही खतरनाक असल्याचे दिसते.

-----------

### वाल्मिक कराड याची प्रकृती बिघडली?

आले. न्यायालयाने त्याला १५ दिवसांची सीआयडी कोठडी दिली. वाल्मिक कराड याची मंगळवारी रात्री वैद्यकीय पथकाने तपासणी केली. त्याला रात्री श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्याने पोलिसांकडे तक्रार केली. त्यानंतर त्याला ऑक्सिजन लावण्यात आले. त्यानंतर त्याला बरे वाटले. तो सकाळी ८.३० वाजता झोपेतून उठला. त्याने नास्ताही केला नाही. दहा वाजता त्याला वैद्यकीय नेण्यात आले. तसेच सकाळी १०.४५ वाजता त्याने आर्धी चपाती खाल्ली. रात्री त्याने जेवण केले नव्हते. तसेच बुधवारी सुध्दा त्याने अर्धी पोळीच खाल्ली असल्याचे समजते. रुग्णालयात जाण्यासाठी आजारपणाचे सोंग तर केले जात नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

----------

### आश्वासनानंतर सामूहिक

महाजन यांच्यावर कारवाई करा, अशीही मागणी गावकऱ्यांची आहे. बीडमधील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला २२ दिवस उलटले आहेत. यातील मुख्य आरोपी अद्याप फरार असल्याने मस्साजोगचे वातावरण तापलं आहे. दरम्यान, याप्रकरणाचा पोलीस तपास वेगाने सुरु असताना मस्साजोगमधील गावकऱ्यांकडून जलसमाधी आंदोलन करण्यात आले. यावेळी एका आंदोलक महिलेची प्रकृती बिघडल्याचे ही समोर आले. सकाळीच ग्रामस्थांनी मस्साजोग शिवारात उतरुन सामूहिक जल समाधी आंदोलन केले. या आंदोलनात गावातील महिला, लहान मुलंही सहभाग होता. पोलिस अधिक्षक नवणीत कॉंवत हे स्वत: आंदोलनस्थळी आल्यावर त्यांनी आश्वासन दिल्यावर आंदोलन मागे घेण्यात आले.

----------

### शरद पवार आणि अजित

पवार हे आगामी काळात एकत्र येण्याची शक्यता आहे. कारण तशी वक्तव्ये आता समोर येऊ लागले आहेत. अजित पवार यांच्या मातोश्री आशा पवार यांनी आज पंढरपूरला जावून विठुरायांचे दर्शन घेतले. यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देताना आपलं कुटुंब पुन्हा एकत्र यावे, अशी भावना व्यक्त केली आहे. यानंतर मंत्री नरहरी झिरवळ यांचे वक्तव्य समोर आले आहे. जसे बजरंगाच्या छातीत प्रभू राम दिसतील, तर माझ्या छातीत शरद पवार आहेत, असे वक्तव्य नरहरी झिरवळ यांनी केले आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचे मोठे वक्तव्य समोर आले आहे. शरद पवार आणि अजित पवार हे एकत्रित येणे चांगली गोष्ट आहे, असे मोठे वक्तव्य प्रफुल्ल पटेल यांनी केले. त्यामुळे राज्यात पुन्हा एकदा राजकीय भुकंप होतो की काय ? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**प्रफुल्ल पटेल नेमकं काय म्हणाले?**

शरद पवार हे आमचे दैवत आहेत. काही राजकीय कारणांवरून आम्ही वेगळे जरी झालो असलो तरी मात्र त्यांच्याविषयी आमच्या मनामध्ये आजही आस्था आहे. भविष्यात सुद्धा पवार कुटुंबीय एकत्रच आलं तर यात काही गैर नाही. कारण मी सुद्धा स्वतःलाच पवार कुटुंबाचा एक सदस्य समजतो आणि पवार कुटुंब एकत्र यावे, अशी माझी सुद्धा इच्छा आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही सुद्धा त्यांना भेटायला गेलो होतो. अनेकांनी राजकीय तर्कवितर्क लावले. त्यांच्या बरोबरचे संबंध आम्हाला आजही टिकवायचे आहेत, अशी प्रतिक्रिया प्रफुल्ल पटेल यांनी दिली.

----------

### बा पांडुरंगा, हा इस्कोट

वाढदिवसाला अजितदादांनी जातीने हजर राहत शुभेच्छा दिल्या. तेव्हा दोन पक्ष एकत्र आणण्याची हलगी वाजली. तर आता अजितदादांच्या आई आशाताई पवार यांनी थेट पांडुरंगालाच पवार कुटुंबातील मतभेद मिटवण्याचे, पुन्हा कुटुंब एकत्र येण्याचे साकडे घातले.

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी – ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते.ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. कंत्राटी कामगार वेतन थकबाकीसंदर्भातील आढावाही यावेळी घेण्यात आला.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि.०२ जानेवारी २०२५



# जीव ओतून क्रीडा क्षेत्रात काम केल्यास यश गाठता येते:डॉ. प्रवीण दिग्रसकर

**सेंटर झोन बॉल बॅडमिंटन (पुरुष) स्पर्धेत खोलेश्वर महाविद्यालयाचा संघ प्रथम तर योगेश्वरी महाविद्यालयाचा संघ द्वितीय**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

क्रीडा क्षेत्रात व्यक्तीने जीव ओतून काम केले तर यश गाठता येते. खेळाचे महत्व जीवनात खूप मोठ्या प्रमाणात आहे खोलेश्वर महाविद्यालयाने यशस्वी खेळाडू तयार करण्याचे काम आज पर्यंत केले आहे आणि विद्यार्थ्यांना या खेळातून प्रेरणा दिली व राष्ट्रीय स्तरावर यशस्वी स्पर्धक झाले. त्यामुळे खेळाडूंनी कोणत्याही स्पर्धेत अतिशय मेहनत केली पाहिजे असे बीड जिल्हा क्रीडा सचिव डॉ. प्रवीण दिग्रसकर यांनी केले. ते येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर व खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित अंतर महाविद्यालयीन बॉल बँडमिनिटंन पुरुष स्पर्धेच्या प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष तथा भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य राम कुलकर्णी यांची उपस्थिती होती. तर मंचावर खोलेश्वर शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर तसेच स्वामी विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर क्रीडा विभागाचे गोविंद कदम, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय अंबाजोगाई चे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. प्रवीण भोसले , योगेश्वरी महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग प्रमुख सारिका जगताप महाविद्यालयाचे उपप्राचार्य बिभीषण फड, उपप्राचार्य दीपक फुलारी, व्यवसाय शिक्षण विभागाचे उपप्राचार्य डॉ.रवींद्र कुंबेफळकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. राहुल चव्हाण आदीं मंचावर उपस्थित होते

यावेळी पुढे बोलताना डॉ. प्रवीण दिग्रसकर यांनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. गोविंद कदम यांनी खोलेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या आठवणी काढून मी या महाविद्यालयात कसा घडलो. हे महाविद्यालय संस्कार देणारे असून मला खूप छान मार्गदर्शन मिळाले म्हणून मी या पदापर्यंत पोहोंचलो . या महाविद्यालयामुळेच मला मोठे होत आले अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या यावेळी स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच खोलेश्वर महाविद्यालयातील क्रीडा विभाग खूप छान आहे. स्पर्धकांनी राष्ट्रीय स्तरावर यश गाठण्यासाठी प्रयत्न करावे असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष राम कुलकर्णी यांनी मानवाच्या मनात जिद्द आणि अभिमान असला पाहिजे यासाठी खेळाडूंनी यश गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे. क्रीडाक्षेत्रात महाविद्यालयाने अनेक स्पर्धक राष्ट्रीय स्तरावर निर्माण केले असल्याचेही त्यांनी सांगितले. सायंकाळी वाजता या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभही पार पडला यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजयी संघांना पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेत खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाईच्या संघाने प्रथम तर योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाईच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.फुलारी यांनी केले तर आभार डॉ.माणिक पोखरकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी विविध महाविद्यालयातून आलेले विद्यार्थी , प्राध्यापक आदींची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान ६ वरून...

## वडवणी सा.बां. विभागाने

करण्याची गरज आहे , गतवर्षी देखील याच रस्त्यावर मोठा निधी टाकण्यात आला होता प्रसार माध्यमानी बातम्या प्रसिद्ध करून कामाची चौकशी करण्याची मागणी करून देखील अर्धवट कामाचे पूर्ण बिल काढण्यात आले होते ,हे सर्व सा बा विभाग आणि गुत्तेदार यांचे साटेलोटे असल्याने गुत्तेदार पोसण्याचे काम सा बा करत आहे? त्यामुळे काम कसेही केले आणि कितीही केले तरी सा बा मात्र गुत्तेदारावर मेहरबान असल्याचे दिसते आहे.

## बीड ते पुणे १३ शिवाई बस सुरु

वाजता बीडकडे येतील .याशिवाय बीड ते छत्रपती संभाजीनगर प्रत्येक ३० मिनिटाला सकाळी ६.०० वाजल्यापासून सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या गाड्या चालू राहतील .अशी माहिती विभागीय नियंत्रक श्रीमती दुसाने यांनी दिली .या गाड्या सुरू केल्यानंतर याचे स्वागत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आले असून मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, समन्वयक सुभाष चौरे, जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, संपादक सर्वोत्तम गावरस्कर ,संपादक राजेंद्र होळकर ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, लक्ष्मण नारनाळे मंगेश निटूरकर,तालुका अध्यक्ष दत्ता आजबे आदींनी केले आहे.

## दोन हजाराच्या वसुली

ही धादात खोटी आहे. कारण कोणतेही ग्रामसेवकांने माझ्याकडून बळजबरीने पैसे घेतले आहेत असे तक्रार कुठेही केलेली नाही. या संवाद बैठकीचे आयोजन आमदार सुरेश धस यांनी केलेले नव्हते तर ते आम्ही तीनही संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. आम्ही ग्रामसेवक संघटना आष्टी पाटोदा आणि शिरूर यांच्या वतीने या अपप्रचाराचा निषेध करत आहोत. त्यामुळे आम्हाला आमदार सुरेश धस यांची बदनामी झाली असून आमच्या संघटनेची देखील बदनामी झाली असल्यामुळे हा खुलासा असल्याची विनंती आष्टी तालुका ग्रामसेवक संघटना अध्यक्ष नवनाथ लोंढे यांनी केली आहे.

## केवायसीचे पैसे मागणाऱ्यांवर

प्रशासनाने प्रत्येक राशनचे केवायसी करणेची अंतिम तारीख ३१ डिसेंबर दिली होती ती संपलेली आहे म्हणून तारीख वाढवुन द्यावे, तसेच शासन प्रशासनाकडून प्रत्येक राशन कार्ड धारकांना केवायसीची सुविधा मोफत असताना सुद्धा राशन दुकानदार केवायसी साठी प्रत्येक राशन कार्ड धारका कडून शंभर रुपये घेतल्या शिवाय केवायसी करत नाहीत आणि गोर गरिबांनी पैसे दिले नाहीत तर गोरगरीब नागरिकांना दुकानातून हाकलून दिले जात आहेत म्हणून आत्तापर्यंत केवायसीचे काम पूर्ण झालेली नाहीत खासदार आणि जिल्हाधिकारी मोहदय यांनी विशेष घालून दोषी राशन दुकानदारांवर नियमानुसार कार्यवाही करावी अशी मागणीचा निवेदन माजी सभापती तथा राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात देण्यात आले आहे यावेळी ड.सैय्यद फारोक,शेख माजेद,गुड्डो भाई,पठाण लतीफखान,इम्रान शिकलगर,शेख फैय्याज,शेख वसीम,अब्दुल करीम व इतर उपस्थित होते,

## जिल्हाधिकारी यांनी जिल्हा

प्रमुखांची बैठक आयोजित करुन त्यांना नवीन वर्षात लोकाभिमुख प्रशासन करण्यासाठी सुचना दिल्या. जिल्हाधिकारी यांनी नवीन दालनात पूरवठा विभागाच्या शिवभोजन संचिकेवर पहिली स्वाक्षरी केली तदनंतर दिवसभर सामान्य प्रशासन विभागातील ग्राम पंचायत विभागाच्या सुनावण्या घेण्यात आल्या.सदरील नवीन वास्तू ही ई–ऑफीस कामकाजाच्या दृष्टीने सुसज्ज केली आहे. तसेच इमारतीच्या छतावर सोलार प्लॅनेटच्या माध्यमातून संपूर्ण इमारत ही सौरउर्जेव्दारे विद्युत पूरवठा केला असल्यामुळे ही इमारत पर्यावरण पूरक आहे.

## अभिवादन बाईक रॅलीस

डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक – नरवीर तानाजी मालुसरे चौक – पाटील चौक – भाजी मंडई – गुरूवार पेठ– छत्रपती शिवाजी महाराज चौक– ज्ञानज्योति सावित्रीमाई फुले चौक येथे रॅलीचा समारोप होणार आहे. अशी माहिती जयंती उत्सव समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



माजलगाव;– तालुक्यातील लुखेगाव येथील ग.नं १ मधील न्युट्रीजॅग हायजीन गुळ उद्योगाच्या ४ थ्या गळीत हंगामाच्या उद्घाटनप्रसंगी माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतीराम पांढरपोटे यांचा सत्कार करतांना न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष तथा निवृत्त मुख्यध्यापक आंबादास रोकडे सर

# देवदुत प्रतिष्ठानच्या अभिनव दिनदर्शिकेचे प्रकाशन

दिंद्रुड । प्रतिनिधी

देवदूत प्रतिष्ठान व साप्ताहिक घोंगडी च्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन संत नारायणबाबा संस्थानचे अध्यक्ष गुरूवर्य ह.भ.प.एकनाथ बाबा माने यांच्या शुभहस्ते करण्यात आले. नववर्षाच्या शुभमुहूर्तावर उमरी येथे हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. देवदूत प्रतिष्ठान च्या वतीने साप्ताहिक घोंगडी दिनदर्शिका गेल्या ५ वर्षांपासून प्रकाशित करण्यात येते.



देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांच्या संकल्पनेतून दरवर्षी दिनदर्शिका प्रकाशित करण्यात येते. दिंद्रुड सह राज्यभरातील नामांकित, राजकीय, सामाजिक व्यक्तींचे वाढदिवस त्याचप्रमाणे विविध सामाजिक उपक्रमाची तारीख या दिनदर्शिकेत नमूद केली जाते. त्यामुळे साहजिकच घोंगडी दिनदर्शिकेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केलेल्या आरोग्यदायी उपक्रमांची नोंद या दिनदर्शिकेत आढळते.

प्रतिवर्षी गुरुवर्य ह.भ.प. एकनाथ बाबा माने यांच्या शुभहस्ते या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात येते. देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने जवळपास पाच हजार अंक मोफत वितरित करण्यात येतात. बुधवारी ह.भ.प. एकनाथ महाराज यांच्या निवासस्थानी उमरी येथे या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी संपादक बंडूजी खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाशआबा काशीद, उद्योजक नागेश ठोंबरे, नागेश कानडे, दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार संतोष स्वामी उपस्थित होते. दिनदर्शिकेच्या मोफत वितरणाचे काम देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर यांनी माध्यमांना दिली.

# मुख्याध्यापकाने सहकारी शिक्षकालाच मागितली लाच

**बीड । प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देत नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी प्रत्येकजण सज्ज होता. मात्र दुसरीकडे आपल्याच शाळेतील शिक्षकाकडून लाचेची मागणी करण्यात मुख्याध्यापक अन् लाचखोराला पकडण्यात बीडची एसीबी सज्ज होती. यात बीड एसीबीला यश आले असून वर्षाचा शेवटही लाचखोर मुख्याध्यापकावर कारवाई करून केला. वर्षभरातही बीड एसीबीने २९ सापळे रचून ५८ आरोपींना गजाआड केले. ही वर्षातील शेवटची कारवाई मिळून ३० कारवाया वर्षात पूर्ण केल्या आहेत.

तक्रारदार हे शिक्षक आहेत. ते वैद्यकीय रजेवर होते. रजेवरुण हजर होण्यासाठी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे त्यांनी अर्ज केला. त्यावर गटशिक्षणाधिकारी यांनी तुमचे मुख्याध्यापक सुर्वे यांच्याकडे अर्ज देण्यास सांगितला. तक्रारदार शिक्षक मुख्याध्यापक सुर्वे यांना भेटले असता त्यांनी सदर अर्जावरुन कर्तव्यावर हजर करुन घेण्यासाठी व गटशिक्षणाधिकारी यांची सही घेण्यासाठी दोन हजार रुपयाची मागणी केली . तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत विभागाकडे तक्रार केली. लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक सुर्वे यांनी तक्रारदार यांना पंचा समक्ष गटशिक्षण अधिकारी यांच्यासाठी दोन हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले . त्यावरुन लोकसेवक सुर्वे यांचे विरुद्ध केज पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप आटोळे, अप्पर अधीक्षक मुकुंद आघाव, बीड उपअधीक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक किरण बगाटे, पोलीस अंमलदार श्रीराम गिराम, भारत गरदे, अविनाश गवळी, खरसाडे, पुरी यांनी केली.

# बारदाणा ३ दिवसांत खरेदी केंद्रावर आला नाही तर आंदोलन -गुंदेकर

बीड । प्रतिनिधी

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना खाजगी बाजारात अपेक्षित भाव मिळत नाही. सध्या नाफेड खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करण्यास शेतकरी भर देत आहेत. मात्र अशा परिस्थितीत ७ दिवसांपेक्षा अधिक काळापासून बारदाणाच नसल्याने सोयाबीन खरेदी बंद पडलेली आहे. सोयाबीनला एकतर अपेक्षित भाव नाही अन् त्याउपर बारदाणाअभावी नाफेडची खरेदी बंद असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असून येत्या ३ दिवसांत बारदाणा उपलब्ध झाला नाही



तर आंदोलन करण्यात येईल असा इशारा संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिला आहे.

या मागणीसह नाफेड शासकीय सोयाबीन खरेदीचा नोंदणी कालावधी हा ३१ डिसेंबर २०२४ असून हा कालावधी १५ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवावा अशी मागणी देखील निवेदनाद्वारे धनंजय गुंदेकर यांनी जिल्हा पणन अधिकारी यांच्याकडे केली आहे. सध्या बीड जिल्ह्यातील सगळ्याच नाफेड खरेदी केंद्रावर बारदाना आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध नसल्याने खरेदी बंद राहत आहे. मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना सोयाबीन विक्री करायची आहे मात्र नाफेडची केंद्रे खरेदी करत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप निर्माण होतोय, येत्या ३ दिवसांत यावर तोडगा काढावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा प्रसिध्दी पत्रकाद्वारे संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिला आहे.

# नववर्षाच्या निमित्ताने रोटरी क्लब माजलगाव सेंट्रलकडून चित्रकला व निबंध स्पर्धा

## ५२२ विदयार्थ्यांचा स्पर्धेत उस्फुर्त सहभाग

माजलगाव । प्रतिनिधी

नवीन वर्षात विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक वातावरण उत्साही व आनंदी राहावे म्हणून नूतन वर्षे २०२५ च्या पहिल्याच दिवशी ०१ जानेवारी बुधवार रोजी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल तर्फे फ्लाईंग बर्ड्स अकॅडमी या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेसाठी शाळेतील ५२२ विद्यार्थ्यांनी उस्फुर्त भाग घेत आपल्यातील उपजत गुणांना वाव दिला.

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल दर वर्षी कडून विविध उपक्रम राबवले जातात त्यात विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन, चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धा अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना



प्रोत्साहन दिले जाते दि ०१ जानेवारी बुधवार रोजी नववर्षाचे औचित्य साधून फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीत रोटरी क्लब कडून इयत्ता १ ली ते ४ थी तील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या त्यात चारशे चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला तसेच इयत्ता ५ वी ते ८ वी तील १२० विद्यार्थ्यांनी इंग्रजी व मराठी माध्यमातून माझे आवडते शिक्षक माझ्या शाळेचे ग्रंथालय अशा विषयावर सुंदर मांडणी करत सुंदर हस्ताक्षरांत निबंधाचे सुलेखन केले हे या स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरले.

यावेळी रोटरीचे विद्यमान अध्यक्ष रो.पांडुरंग चांडक व माजी सचिव रो.सुनील शिंदे यांनी स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका सारिका बजाज सह भावनी आरती, संतोषी मानधणे, रोहिणी जोशी, अधिका शिंदे, धनश्री नांगरे,जेना बिश्वजीत,मोहमद शाहिद,आकाश कोरडे या सहशिक्षकानी परिश्रम घेतले.

# न्युट्रीजॅग गुळ उद्योगाने नेहमीच छोट्या शेतकऱ्यांचे हित जोपासले – सरपंच ॲड.नासेर खॉ पठाण

**न्युट्रीजॅग गुळ उद्योगाच्या ४ थ्या गळीत हंगामाचा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ**

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील लुखेगाव येथील ग.नं १ मध्ये कोणत्याही प्रकारची सोयीसुविधा उपलब्ध नसताना गेल्या तीन वर्षांपूर्वी न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष सेवानिवृत्त मुख्याध्यापक अंबादास रोकडे सर यांनी गुळ उद्योग उभारुन लुखेगाव येथील तरुणांना रोजगारा बरोबरच छोट्या शेतकऱ्यांचे नेहमीच हित जोपासले असल्याचे प्रतिपादन लुखेगावचे सरपंच ॲड नासेर खॉ पठाण यांनी चौथ्या गळीत हंगामाच्या शुभारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात केले.

लुखेगाव येथील न्युट्रीजॅग गुळ उद्योगाच्या चौथ्या गळीत हंगामाच्या शुभारंभ दि ३१




डिसेंबर मंगळवार रोजी दुपारी ४:०० वाजता आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्य अध्यक्षस्थानी लुखेगाव येथील सरपंच ॲड नासेर खॉ पठाण यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच खुदायात खॉ.पठाण,खय्युम पठाण,पत्रकार ज्योतिराम पाढंरपोटे,पत्रकार वाजेद पठाण,टाकरवण येथील गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष रेदासणी,अन्साराम वानखेडे ग्राम पंचायत सदस्य इमानदार अन्सरखॉ,शाहेद पठाण,फेरोज पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना सरपंच ॲड नासेर खॉ पठाण बोलताना म्हणाले की,लुखेगाव या अतिदुर्गम भागात कोणत्याही प्रकारची सोयीसुविधा नसताना न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष अंबादास रोकडे सर यांनी गेल्या तीन वर्षापुर्वी गुळ उद्योग उभारुन यशस्वी वाटचाल सुरू केली आहे.तसेच या गुळ उद्योगात गावातील तरुण सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देत छोट्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्राधान्याने ऊस गाळप करत त्यांच्या ऊसाचा प्रश्न पण सोडवीला आहे.तसेच न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाने यावर्षीपासुन पुर्णपणे सेंद्रिय पद्धतीने हायजॅनीक गुळ छोट्या पॅकींग मध्ये उत्पादीत करण्याच्या घेतलेला निर्णयाचे स्वागत केले.तसेच विवीध मान्यवरांच्या उपस्थितीत न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाच्या चौथ्या गळीत हंगामाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते गव्हाणीत मोळी टाकून करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्युट्रीजॅग गुळ उद्योग समुहाचे अध्यक्ष अंबादास रोकडे यांनी केले तर सुत्रसंचलन सुरेश रोकडे यांनी केले.तसेच उपस्थिती मान्यवरांचे आभार अजित रोकडे यांनी मानले

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
गुरुवार दि.२ जानेवारी २०२५ ४

# ऊसदराबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला इशारा



**कोल्हापूर : विधानसभेच्या निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. त्याची पूर्तता राज्य सरकारने तातडीने करावी. तसेच गतवर्षी तुटलेल्या उसास दुसरा हप्ता २०० रूपये व चालू वर्षीच्या तुटणाऱ्या उसाला ३ हजार ७०० रूपयाची पहिली उचल द्या. यासंदर्भात कारखानदार व संघटनांची तातडीने बैठक लावावी. अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्याकडे बुधवारी(ता.०१) करण्यात आली.**

निवेदनाद्वारे दिलेल्या माहितीनुसार, मागील ५ वर्षात केंद्र व राज्य सरकारच्या धोरणामुळे शेतकरी रसातळाला गेला आहे. त्यातच सोयाबीन, कापूस, तूर, दूध, साखर, डाळी आदींच्या पडलेल्या दरामुळे शेतकरी मातीमोल झालेला आहे. उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीत शेतकऱ्यांना आपला शेतीमाल विकावा लागत आहे. रासायनिक खतांच्या किंमतीत भरमसाठ वाढ झालेली आहे. डी.ए.पी. मध्ये पुन्हा २५० रूपयांची वाढ झालेली आहे. किटनाशके, तणनाशकांच्या किंमतीत मोठी वाढ झालेली आहे. सरकार हमीभाव जाहीर करते. पण हमीभावाचा कायदा अस्तित्वात नसल्याने शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी किंमतीत शेतीमाल विकावा लागत आहे. परिणामी गेल्या ५ वर्षात शेतकऱ्यांचे कर्ज हे दुप्पट झालेले आहे. एका बाजूला केंद्र सरकार देशातील कार्पोरेट कंपन्यांचे १० लाख कोटींच्या कर्जाचा निर्णय घेत ते कर्ज राईट ऑफ करत आहे. दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांचे कर्ज दुप्पट होते हे अतिशय दुर्दैवी गोष्ट आहे. महायुती सरकारला शेतकऱ्यांनी भरभरून मते दिलेली आहेत. राज्य सरकारने येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपला दिलेला शब्द पाळून संपूर्ण कर्जमाफी करण्याची मागणी करत असल्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजित पोवार, स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष धनाजी पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राजाराम देसाई, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पाटील, विक्रम पाटील, सचिन शिंदे, कोल्हापूर शहराध्यक्ष संदीप चौगुले , सुरेश म्हाऊंटकर ,तानाजी मगदूम , नामदेव भराडे, बसगोंडा बिराजदार , विशाल चौगुले यांचेसह कोल्हापूर जिल्ह्यातील स्वाभिमानीचे पदाधिकारी ऊपस्थित होते.

# हरभऱ्याची कमी उगवण होण्याची तीन कारणे



**बीड: पेरणीनंतर हरभरा पिकात कधी –कधी कमी उगवण झालेली दिसते. याच कारण म्हणजे हरभऱ्याची कोरडवाहू क्षेत्रात ट्रॅक्टरने पेरणी करताना पेरणीच्यावेळी बियाणे कमी जास्त खोलीवर पेरल जात. बियाणे उथळ पडल्यामुळे वरच्या थरातील कमी ओलीमुळे बियाणे उगवण्यासाठी पुरेशी ओल नसल्यामुळे अर्धवट अंकुरण होऊन कमी उगवण होते. त्यामुळे पेरणीची खोली योग्य म्हणजेच ६ ते ८ सेंटीमीटर राखावी लागते. यावर उपाय करताना पाण्याची सोय असल्यास स्प्रिंकलरने संपूर्ण शेत ओलवून घ्याव. योग्य प्रकारे वाफसा येऊ द्यावा. त्यानंतरच ट्रॅक्टरने किंवा बैलजोडीचलित पेरणीयंत्राने पेरणी करावी.**

बहुतांशवेळा शेत तयार करुन शेतकरी कोरड्यात हरभऱ्याची पेरणी करतात. त्यानंतर स्प्रिंक्लरने पाणी दिल जात. अशावेळी कमी किंवा जास्त पाणी दिल्यास बियाण्याला बुरशी चढते आणि हरभऱ्याची कमी उगवण होते. त्यामुळे योग्य आणि एकसमान उगवणीसाठी पेरणीपुर्वी जमीन ओलीत करावी. योग्य प्रकारे वाफसा येऊ द्यावा आणि त्यानंतरच हरभऱ्याची पेरणी करावी. पिकाची पूर्ण उगवण झाल्यानंतर पीक रोपावस्थेच्या सुरुवातीच्या अवस्थेत असताना हलके ओलीत करावे. म्हणजेच तुषार सिंचनानेपाणी देण्याची वेळ दोन ते तीन तासांपेक्षा जास्त असू नये. त्यामुळे जमिनीतील राहिलेले बियाणेसुद्धा उगवत आणि पिकाला रोप अवस्थेतच्या सुरुवातीला पाण्याचा ताण बसणार नाही.

हरभरा पिकातील दुसरी महत्वाची समस्या म्हणजे पीक उगवल्यानंतर काही वेळा रोपांची कतरण झालेली दिसते. कारण हरभरा उगवण अवस्थेत असताना भुईकीडा, उडद्या किंवा काळी म्हैस यासारख्या किडींचा प्रादुर्भाव होतो. या किडी कोवळी रोपे कातरतात. यालाच कतरण असं म्हणतात. कतरण झाल्यामुळे कोरडवाहू हरभऱ्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान होतं. यावर उपाय करताना पाण्याची सोय असल्यास आधी ओलित करावे. त्यानंतर शेत वाफश्यावर असताना हरभऱ्याची पेरणी करावी. आधी ओलीत केल्यामुळे जमिनीत मातीच्या ढेकळाखाली लपलेले किडे मातीच्या ओल्या थराखाली गाडले जातात. आणि किडीचा प्रादुर्भाव कमी राखण्यास मदत होते. पेरणी करताना किंवा शेतात रोटाव्हेटर करण्यापुर्वी प्रती एकर ४ ते ५ किलो दाणेदार क्लोरपायरीफॉस चा वापर करावा. हरभऱ्याची पेरणी झाल्यानंतर उगवणीपुर्वी साधारण २ ते ३ दिवस आधी किंवा पीक रोपावस्थेत असताना सुरुवातीच्या अवस्थेत साध्या पंपाने क्लोरपायरीफॉस किंवा क्विनॉलफॉस २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून नोझलला प्लॅस्टिकचे हुड लावून जमिनीलगत दाट फवारणी करावी. त्यामुळे कोवळ्या कोंबाची कतरण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव कमी करता येतो. हरभऱ्यातील तिसरी महत्वाची समस्या आहे मुळसड. पेरणीनंतर १७ ते २२ दिवसांनी रोपे अचानक सुकतात. रोपे उपटल्यानंतर मुळे कुजलेली दिसतात, मुळांवर पांढरी बुरशी वाढलेली दिसते. त्यामुळे रोपे वाळतात, यालाच मुळसड म्हणतात. शेत ओलीत करुनही शेतकरी काहीवेळा पेरणीची घाई करतात. मशागत नीट न झाल्यामुळे किंवा खोल नांगरट न केल्यामुळेही हरभऱ्यात मुळसडीचा प्रादुर्भाव दरवर्षी वाढताना दिसतो. यावर उपाय करताना पेरणीपुर्वी साधारण अर्धा तास आधी ट्रायकोडर्मा ५ ते १० मिली प्रति किलो बियाणे या प्रमाणे बियाण्यावर बीजप्रक्रिया करावी. ट्रायकोडर्मा उपलब्ध नसल्यास रासायनिक बुरशीनाशकाची प्रक्रिया केल्याशिवाय हरभऱ्याची पेरणी करु नये. अशाप्रकारे हरभरा पेरणीपुर्वी जमीन व्यवस्थापन, बीजप्रक्रिया आणि योग्य ओलीत व्यवस्तापन केल्यास हरभऱ्याचे पुढे होणारे नुकसान टाळता येते.




# तुरीतील फायटोप्थोरा ब्लाईट रोगाच नियंत्रण

बीडः तूर पीक सध्या फांद्या फुटण्याच्या अवस्थेत आहे. बऱ्याच ठिकाणी सध्या तुरीच्या या अवस्थेतच फायटोप्थोरा ब्लाईट या रोग आलाय. या रोगामुळे तुरीचे पीक करपून जाते. तुरीची मर चार प्रकारच्या बुरशीमुळे होते. त्यापैकी फायटोप्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या रोगाला फायटोप्थोरा ब्लाईट असं म्हणतात. हा रोग खर तर रोपावस्थेतच येतो पण गेल्या वर्षीपासून मराठवाड्यात काही ठिकाणी हो रोग फाद्या फुटण्याच्या अवस्थेत आणि काही ठिकाणी पिकाच्या शेवटच्या टप्प्यात ही येऊ लागलाय. यो रोगामुळे ४० ते ५० टक्क्यापर्यंत उत्पादनात घट येते. त्यामुळे या रोगाची वेळेवर लक्षणे ओळखण अत्यंत आवश्यक आहे.

या रोगाची लक्षणे कशी ओळखायची तर खोडावर गोलाकार टोकाकडे निमुळते होत जाणारे राखेरी रंगाचे चट्टे पडलेले दिसतात. काही दिवसांनी त्या ठिकाणी खाच पडलेली दिसते. खोडाचा भाग फुगतो आणि त्याठिकणी गाठी येतात. प्रादुर्भाव जर जास्त असेल तर गाठीमधून चीकट पदार्थ येऊ लागतो. खोड तपकिरी पडून करपते. फांद्या पण करपतात. अशावेळी पाऊस जर झाला तर या रोगाच प्रमाण वाढतं. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच ताबडतोब उपाय करा. सगळ्यात महत्वाचं म्हणजे आपल्याला तुरीची लागवड करतानाच काळजी घ्यायची आहे. यामध्ये पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडन, उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करण, पिकाची फेरपालट आणि बियाण्याला बीज प्रक्रिया करण, याशिवाय तीन वर्षापेक्षा जास्त काळ एकाच जमिनीत तूर पीक न घेण या गोष्टींचा समावेश होतो. ही झाली पीक लागवडीपुर्वी फायटोप्थोरा ब्लाईट रोग येऊ नये म्हणून घ्यायची खबरदारी. रोग आल्यानंतर काय उपाय करायचे हे ही सांगते यामध्ये आपल्याला रोगाची लक्षणे दिसताच ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक किंवा बायोमिक्स ची २०० ग्रॅम किंवा २०० मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून आळवणी करायची आहे. रासायनिक बुरशीनाशकामध्ये मेटाल्कझिल घटकामुळेही फायटोप्थोरा बुरशीचे चांगले नियंत्रण होतं असं प्रयोगावरून तज्ज्ञांना दिसून आलं आहे. याशिवाय शेताच्या चारही बाजूस चर काढावा त्यामुळे शेतात पाणी साचून फायटोप्थोरा बुरशीचा प्रादुर्भाव वाढणार नाही. शेतात काश्या, पिकाचे राहीलेले अवशेष, धसकटे आणि काडीकचरा असू नये. शेत आणि बांध नेहमी स्वच्छ ठेवा त्यामुळे रोगाचा प्रादुर्भाव वाढणार नाही.

# सोयाबीन वाणांनी वाढविला विद्यापीठाचा लौकिक



**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील सोयाबीन संशोधन केंद्राद्वारे विकसित सरस वाणांचा देशभरात प्रसार झाला आहे. आजवरच्या वाटचालीत या केंद्राने सोयाबीनचे बदलत्या हवामान स्थितीस अनुकूल, कीड–रोग प्रतिकारक, उत्पादनाच्या बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण असे १७ वाण विकसित केले आहेत. दर्जेदार वाण संशोधनात देश पातळीवर मध्य प्रदेशातील जबलपूर येथील सोयाबीन संशोधन केंद्रानंतर परभणी येथील सोयाबीन संशोधन केंद्राचा क्रमांक आहे. या संशोधन केंद्राच्या तांत्रिक शिफारशी स्वीकारून शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या उत्पादकतेत वाढ केली. या वाणांनी शेतकऱ्यांच्या अर्थकारणात बदल घडविला आहे.**

गेल्या काही वर्षांत खरीप हंगामातील कपाशी या नगदी पिकाला मागे सारत सोयाबीन हेच मुख्य पीक झाले आहे. पिवळे सोने म्हणून ओळख असलेल्या या तेलवर्गीय पिकांवर राज्यातील मराठवाडा, विदर्भासह राज्याच्या बहुतांश भागातील शेतकऱ्यांचे अर्थकारण आधारले आहे. कृषी विद्यापीठामध्ये १९७५ मध्ये भारतीय कृषी संशोधन परिषदेतर्फे (आयसीएआर) अखिल भारतीय समन्वित सोयाबीन संशोधन प्रकल्प स्थापन करण्यात आला. राज्यातील हा पहिला संशोधन प्रकल्प आहे. या केंद्राचा भारतातील प्रमुख सोयाबीन संशोधन केंद्रात समावेश आहे.

**सोयाबीनचे १७ वाण संशोधित....**

परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील सोयाबीन संशोधन केंद्राने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. या केंद्राने १९९५ ते २०२३ याकालावधीत १३ वाण प्रसारित केले आहेत, तर ४ वाण प्रसारणाच्या मार्गावर आहेत. १९९५ मध्ये एमएयूएस १ (आरती),एमएयूएस २ (पुजा), १९९८ मध्ये एमएयूएस ४७ (परभणी सोना),२००० मध्ये एमएयूएस ३२ (प्रसाद), २००१ मध्ये एमएयूएस ६१ (प्रतिकार), एमएयूएस ६१–२ (प्रतिष्ठा),२००२ मध्ये एमएयूएस ७१ (समृद्धी), २००३ मध्ये एमएयूएस ८१ (शक्ती), २००९ मध्ये एमएयूएस १५८, २०१४ मध्ये एमएयूएस १६२ आणि २०१८ मध्ये एमएयूएस ६१२,२०२२ मध्ये एमएयूएस ७२५, २०२३ मध्ये एमएयूएस ७३१ हे वाण प्रसारित झाले आहेत. एमएयूएस ७३२,एमएयूएस ७९१, एमएयूएस ७९३, एमएयूएस ७९५ हे ४ नवीन वाण आहेत.

**पैदासकारांचे योगदान...**

या केंद्राचे आजवरचे प्रभारी अधिकारी तथा पैदासकार डॉ. ए. आर. सिंग, प्रो. एस. एम. सुदेवाड, डॉ. पी. आर. खापरे, डॉ. आय. एस. माद्रप, डॉ. खिजर बेग, डॉ. एस. पी. मेहत्रे यांचे वाण विकसित करण्यात महत्त्वपूर्ण योगदान आहे. डॉ. बेग यांनी एमएयूएस १५८, एमएयूएस १६२, एमएयूस ६१२ हे वाण स्वतंत्ररीत्या विकसित केले आहेत. तर एमएयूस ७२५ हा वाण डॉ. म्हेत्रे यांच्या समवेत विकिसित केला आहे. कुलगुरू डॉ. इंद्र मणी, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांच्या मार्गदर्शनात संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी तथा पैदासकार डॉ. सुनील उमाटे कीटकशास्त्रज्ञ डॉ. आर. एस. जाधव, सहायक पैदासकार आर. एस. घुगे हे शास्त्रज्ञ कार्यरत आहेत. सोयाबीनच्या पैदासकार (ब्रीडर सीड) बियाण्याच्या कृषी मंत्रालयाकडून देण्यात येणाऱ्या आवंटनामध्ये परभणी कृषी विद्यापीठाचे सोयाबीनचे वाण पहिल्या पाच मध्ये आहेत. सोयाबीन वाणांच्या पैदासकार बियाण्याचा पुरवठा महाबीज तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांना केला जातो. मागणी वाढल्याने बियाणे उत्पादन वाढ करण्यात आली आहे. आम्ही शेतकरी संघामार्फेत उस्मानाबाद जिल्ह्यात सोयाबीनचे सुमारे तीन हजार एकरवर बीजोत्पादन घेत असतो. त्यात विद्यापीठाच्या एमएयुएस १५८, एमयूएस ७१, एमएयूएस १६२, एमएयूएस ६१२, एमएयूएस ७२५ वाण सरस या दोन वाणांचा ८०० एकर बीजोत्पादन पावसाच्या खंड काळात चांगले उत्पादन मिळेत. कीड–रोग प्रतिकार आहेत. सोयाबीनमध्ये रुंद वरंबा सरी तंत्रज्ञान अनेक बाबतीत फायदेशीर आहे.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीच्या लढाईत इंग्रजांनी बंगालच्या नबाबाचा पराभव केला. या विजयामुळे ईस्ट इंडिया कंपनी सरकारचा पाया घातला गेला आणी ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीने कोलकाता काबीज केले.
१८३९ : लुई दागुएरे यांनी चंद्राचा पहिला फोटो प्रदर्शित केला होता.
१८८१ : लोकमान्य टिळकांनी संपादित केलेल्या 'मराठा' या दैनिकाची सुरूवात झाली.
१८८५ : पुणे यथे फर्ग्युसन महाविद्यालय सुरू झाले.
१९०५ : मांचुरियातील पोर्ट ऑर्थर सिटी येथील लढाईत जपानी सैन्याने रशियाचा पाडाव केला. आशियाई देशाने युरोपातील देशाचा केलेला पराभव ही त्या काळातील अतिशय महत्त्वाची घटना होती.
१९३६ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाची स्थापना
१९४२ : दुसरे महायुद्ध जपानी फौजांनी मनिला, फिलिपाइन्सवर ताबा मिळवला.
१९४५ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी न्यूरेम्बर्ग, जर्मनी येथे तुफानी बॉम्बवर्षाव केला.
१९५४ : राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी 'भारतरत्न' पुरस्कारांची स्थापना केली.
१९८५ : पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयाच्या शताब्दी निमित्ताने टपाल तिकिटाचे प्रकाशन.
१९८९ : मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार सफदर हश्मी यांची नवी दिल्ली येथे पथनाट्य करत असतानाच निर्घृण हत्या
१९९१ : तिरुअनंतपुरम च्या विमानतळाला आंतराष्ट्रीय चा दर्जा देण्यात आला.
१९९८ : डॉ. सरोजिनी बाबर यांना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते सन्माननीय डी. लिट. पदवी प्रदान
१९९९ : अमेरिकेत हिमवादळात मिल वॉकीमध्ये१४ इंच टर शिकोगामध्ये १९ इंच हिम पडला. शिकागोचे तापमान – १३ इतके कमी झाले.
२००० : संत ज्ञानेश्वरांची प्रतिमा असलेल्या चलनी नाण्याचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते प्रकाशन.
२००० : पनामा सरकारने ८५ वर्षांच्या कालखंडानंतर पनामा कालव्याचा पूर्ण ताबा घेतला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७८ : भारताचेपद्मभूषण पुरस्कारविजेते मन्नत्तु पद्मनाभन यांचा जन्म.
१९०५ : भारताचेपद्मभूषण पुरस्कारविजेते जैनेंद्र कुमार यांचा जन्म.
१९०६ : भारतातील प्रसिद्ध उद्योगपती डी. एन. खुरोदे यांचा जन्म.
१९२० : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (मृत्यू: ६ एप्रिल १९९२)
१९३२ : हरचंदसिंग लोंगोवाल अकाली दलाचे अध्यक्ष (मृत्यू: २० ऑगस्ट १९८५)
१९३२ : भारतीय चित्रपट निर्माते जॉनी बक्षी यांचा जन्म.
१९४० : अमेरिकी–भारतीय वैज्ञानिक एस. आर.श्रीनिवास वर्धन यांचा जन्म.
१९५९ : किर्ती आझाद क्रिकेटपटू आणि खासदार
१९६० : रमण लांबा क्रिकेटपटू (मृत्यू: २३ फेब्रुवारी १९९८)
१९७० : स्विमर बुला चौधरी यांचा जन्म.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३१६ : अल्लाउद्दीन खिलजी दिल्लीचा सुलतान
१९३५ : मोरेश्वर वासुदेव तथा नरकेसरी अभ्यंकर स्वातंत्र्यसैनिक, टिळकांच्या विचारसरणीचे मध्य प्रांताचे काँग्रेस नेते, वकील (जन्म: १९ ऑगस्ट १८८६)
१९४३ : हुतात्मा वीर भाई कोतवाल
१९४४ : महर्षि विठ्ठल रामजी शिंदे अस्पृश्यता निवारण हे जीवनध्येय मानलेले व्यासंगी समाजसुधारक (जन्म: २३ एप्रिल १८७३)
१९५० : समाज सेविका तसेच स्वातंत्र्य सैनिकांमधील एक डॉ.राधाबाई यांचे निधन.
१९५२ : व्यक्तींचे पुतळे करणारे महान शिल्पकार जो डेव्हिडसन यांचे निधन.
१९८८ : भारतीय चित्रपट सृष्टीचे कलाकार अन्वर हुसेन यांचे निधन.
१९८९ : सफदर हश्मी मार्क्सवादी विचारसरणीचे पथनाट्यकार, लेखक, दिगदर्शक, कवि आणि गीतकार (जन्म: १२ एप्रिल १९५४)
१९९९ : विमला फारुकी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या आणि महिला चळवळीतील कार्यकर्त्या
२००२ : अनिल अग्रवाल पर्यावरणवादी (जन्म: १९४७)
२०१० : गुजराती कवी राजेंद्र शहा यांचे निधन.
२०१५ : भारतीय शास्त्रज्ञ वसंत गोवारीकर यांचे निधन.

# जनावरांमध्ये आढळणाऱ्या अनिष्ट सवयींवर उपाय

जनावरांमध्ये डोळा फिरवणे, अखाद्य वस्तू खाणे, अंग घासणे, जीभ गुंडाळणे यासारख्या काही अनिष्ट सवयी दिसून येतात. शारीरिक ताण तसेच आहार, व्यवस्थापनाच्या अयोग्य नियोजनामुळे या सवयी दिसून येतात. ही लक्षणे ओळखून तातडीने व्यवस्थापनात बदल करावेत. जनावरे अस्वस्थतेमुळे विविध ताण तणावात असतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि दुग्धोत्पादनावर अनिष्ट परिणाम होतो. यासाठी दररोज जनावरांच्या हालचाली तसेच अयोग्य सवयींवर लक्ष ठेऊन त्यांना योग्य वातावरण आणि आहार देणे गरजेचे आहे.

कोणतीही दृश्यमान वस्तू नसताना डोळे कक्षेत फिरवले जातात. सहसा ही प्रवृत्ती वासरांमध्ये दिसून येते. प्रौढ जनावरांचे डोळा फिरवणे हे वर्तन काहीवेळा तणाव, अस्वस्थता, किंवा शारीरिक समस्यांचे सूचक असू शकते. डोळा फिरवणे हे डोळ्यांच्या दुखापती, प्रादुर्भाव, किंवा न्यूरोलॉजिकल समस्यांचे लक्षण असू शकते. वारंवार डोळा फिरवण्यामुळे डोळ्यांमध्ये थकवा येतो. अशा प्रकारच्या वर्तनामुळे डोळ्यांच्या हालचालींवर ताण येऊन दृष्टीवर परिणाम होऊ शकतो. डोळा फिरवणे हे मानसिक ताण, असुरक्षितता, किंवा अस्वस्थतेचे लक्षण असते. योग्य प्रशिक्षण आणि वर्तन सुधारणा करून या सवयीवर नियंत्रण मिळवता येईल. जनावरे ताणामुळे डोळे फिरवू शकतात. त्यामुळे त्यांना शांत करण्यासाठी योग्य तंत्र शिकवण्याचे महत्त्व आहे. मसाज, आरामदायक वातावरण आणि समर्पक आहार यामुळे ताण कमी होऊ शकतो.

# महाकाळा फाटा येथे भीषण अपघात एकाच कुटुंबातील चार जण ठार

जालना । प्रतिनिधी

बीड जालना रोड वरील अंबड तालुक्यातील महाकाळा फाटा इथे आज नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देवदर्शन करून परतणाऱ्या जालन्यातील कुटुंबावर काळाने घाला घातला. अंबड तालुक्यातील महाकाळा फाटा येथे नादुरुस्त असल्याने उभ्या असलेल्या ट्रकला मागून येणारी कार धडकल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

अक्कलकोटवरून गणपूरला जात असलेल्या भाविकांच्या गाडीला अपघात होऊन चार भाविकांचा मृत्यू झाला आहे. मृत एकाच कुटुंबातील असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. सोलापूर- धुळे महामार्गावर महाकाळा येथे बुधवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हा भीषण



अपघात झाला आहे. यात महामार्गावर नादुरुस्त उभ्या असलेल्या ट्रकला बीडकडून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी होंडा सिटी कारने पाठीमागून धडकली. अपघातग्रस्त कारमध्ये सहा जण होते. यातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. ग्रामस्थांनी गाडी ट्रकबाहेर काढत जखमींना आणि मृतदेहांना बाहेर काढले.

या अपघातात अनिता परशुराम कुंटे (४८, रा. छ. संभाजीनगर), भागवत यशवंत चौरे (४७), सृष्टी भागवत चौरे (१३), वेदांत भागवत चौरे (११, सर्व रा.अंबड रोड, जालना) येथील रहिवाशी आहेत. तर या चारचाकीचा चालक वाचला असून तो जखमी झाला आहे. परशुराम लक्ष्मण कुंटे (५५) हे स्वतः गाडी चालवत होते. ते छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी आहेत. तर छाया भागवत चौरे (४०, रा. अंबड रोड, जालना) या जखमी झाल्या आहेत.

गेल्या आठवड्यात शहागड येथे उभ्या असलेल्या ट्रकला आयसरची धडक बसल्याने दोन जण ठार झाले होते. बुधवारी पुन्हा नादुरुस्त उभ्या असलेल्या वाहनांमुळे चार जणांचा बळी गेला आहे. जखमींना छत्रपती संभाजीनगर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर मृतदेह शवविच्छेदनासाठी शहागड येथे शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. घटनास्थळी गोंदी पोलीस ठाण्याचे पथक दाखल झाले असून त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे.

# मेजर एस.पी. कुलकर्णी यांचा सेवागौरव

## सेवानिवृत्तीनंतरच्या जीवनास अनेकांच्या शुभेच्छा




अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी (विज्ञान) महाविद्यालयातील प्रा. राष्ट्रीय छात्रसेनेचे निवृत्त अधिकारी मेजर एस.पी.कुलकर्णी यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने योगेश्वरी महाविद्यालय, स्वा.रा.ती. महाविद्यालय तसेच स्नेही मित्र मंडळ यांच्या वतीने गौरविण्यात आले.पतसंस्थेचे अध्यक्ष एस.पी.कुलकर्णी, गौरवमुर्ती मेजर एस.पी. कुलकर्णी,योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, प्राचार्य डॉ.एम.व्ही. कानेटकर, अपर्णा कुलकर्णी,राम कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मेजर एस.पी. कुलकर्णी हे विद्यार्थी प्रिय प्राध्यापक म्हणून ओळखल्या जायचे अध्यापना बरोबरच सांस्कृतिक,सामाजिक उपक्रमात त्यांनी सतत सहभाग घेतला तसेच त्यांनी वृक्षारोपणाच्या माध्यमातून संस्था तसेच विविध ठिकाणचा परिसर सुजलाम सुफलाम केला तसेच छात्रसेनेचे छात्रसैनिक संचलनासाठी राष्ट्रीय स्तरापर्यंत पोहंचले यात मेजर एस.पी.कुलकर्णी यांचा मोठा वाटा असून त्यांनी सामाजिक सदभाव जपला सेवानिवृत्तीनंतरचा काळ अधिकाधिक चांगला व्हावा असे मत संचालक एन के गोळे गांवकर, प्रा डॉ.गणेश पिंगळे, प्राचार्य रमण देशपांडे, रविंद्र मठपती, संकेत तोरंबेकर व उपस्थितांनी व्यक्त केले. समाजसेवेच्या माध्यमातून पुढील काळात त्यांचे कार्य चालूच राहील असे कमलाकर चौसाळकर यांनी सांगितले.

सत्कारास उत्तर देताना मेजर एस.पी.कुलकर्णी म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून जवळपास बत्तीस वर्षे सेवेची संधी मिळाली माझ्या कार्याची दखल घेऊन संस्था,समाजात वेळोवेळी गौरव झाला आपले काम निष्ठेने केले सेवानिवृत्तीनंतरच्या काळात सामाजिक कार्यात कार्यरत राहणार असल्याचे ते म्हणाले या कार्यक्रमास विविध मान्यवर तसेच कुलकर्णी परिवारातील सदस्य,कर्मचारी उपस्थित होते.

## शिक्षणमहर्षी प्रा.धोंडीराम राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

जालना । प्रतिनिधी

विधान परिषदचे माजी आमदार तथा मराठवाडा शिक्षणमहर्षी प्राचार्य धोंडीरामजी राठोड यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मंठा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी आमदार धोंडीरामजी राठोड यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधुन दिनांक ३ जानेवारी शुक्रवार रोजी नामांकित डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी व आवश्यक्य असल्यास मोफत शस्त्रक्रियाचे शिबिर सकाळी १० ते ५ यावेळत मंठा येथील जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ मैदान तहसील रोड येथे आयोजित करण्यात आले आहे.तसेच(ता.३) शुक्रवार रोजी दुपारी १२ वा. प्रख्यात कवी प्रा. फ.मु.शिंदे,डॉ संजीवनी तळेगावकर, नारायण पुरी,अरुण पवार,भरत दौंडकर यांची काव्य मैफिल रंगणार



आहे.तर दुपारी २ वा. मा.आ. धोंडीरामजी राठोड यांचे अभिष्टचिंतन सोहळा व जननायक गौरव ग्रंथाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात येणार आहे.तर ४ जानेवारी शनिवार रोजी रात्री रात्री ७:३० वा. प्रख्यात कीर्तनकार रामायणाचार्य भागवताचार्य ह.भ.प.श्री समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून हरी कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले आहे.तरी परिसरातील नागरिकांनी मोफत आरोग्य शिबिर,कवी मफिल, व हरी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार राजेश राठोड व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी केली मेट्रोतून सफर

## आदर्श गुरुकुल व वाघोरा शाळेची ५ दिवसीय सहल परतली

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, आदर्श गुरुकुलची सहल उपक्रम दि. २५ ते ३० डिसेंबर दरम्यान पाच दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन केशव बादाडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विविध पर्यटन स्थळांना भेट देऊनही सहल सुखरूप परतली आहे.

सहलीची सुरुवात सांस्कृतिक आणि ऐतिहासिक राजधानी असलेले पुणे येथून सुरुवात झाली. महागणपती रांजणगाव, विजयस्तंभ, छ. संभाजी महाराज समाधी तुळापूर, संत ज्ञानेश्वर महाराज समाधी आळंदी, संत तुकाराम महाराज मंदिर व गाथा मंदिर, सिंहगड, दगडूशेठ गणपती, शनिवार वाडा, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेला भिडे वाडा, लाल महल,





जेजुरी, श्री. बालाजी मंदिर नारायणपूर, पुरंदर किल्ला, वाई चित्रपट शूटिंग पॉईंट, पाचगणी पर्यटन व चित्रपट शूटिंग पॉईंट, महाबळेश्वर दहा पर्यटन स्थळे- पंचगंगा, कृष्णा, वेण्णा, कोयना, सावित्री, गंगोत्री या ५ नद्याचे उगमस्थान, प्रतापगडावरील पराक्रमाची माहिती आणि अफजल खानाची समाधी, महाडचे चवदार तळयाचा सत्याग्रहाचे ठिकाण, जिजाऊ मासाहेब यांची समाधी पाचाड, स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड, गणपतीपुळे बीच या ठिकाणी समुद्रामध्ये लाटा सोबत खेळत खूप आनंद घेतला व गणपती मंदिर, नानिज मठ पन्हाळा किल्ला पावनखिंड ज्योतिबा मंदिरासह सहाशी पर्यटन, वन पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन , मनोरंजन पर्यटनाचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. त्याचबरोबर इयत्ता सहावी मधील सफर मेट्रोची हा पाठ असल्यामुळे विद्यार्थ्यांना पुण्यात मेट्रो ट्रेनची सफर घडवून आणली विद्यार्थ्यांना तिकीट कसे काढायचे प्रत्येकाच्या हातात देऊन त्या गेटच्या बाहेर कसे पडायचे व मेट्रोमध्ये ऑटोमॅटिक दरवाजा उघडला नंतर खूप सावधगिरीने बसण्याचे व उतरण्याचे अनुभव आला. ऑटोमॅटिक जिना मध्ये बसून खाली जाणे वर येणे अनुभव घेतला. विद्यार्थी कुतूहलाने सर्व परिसर न्याहाळत होते काहींच्या चेहऱ्यावर आनंद उत्सुकता जिज्ञासा तर काहींच्या चेहऱ्यावर निरागसपणा होता हा प्रवास संपूर्ण असे वाटत असतानाच मेट्रोचे रामवाडी स्थानक आले. या सहलीचे मार्गदर्शन केशव बादाडे यांनी केले यशस्वीतेसाठी सहकार्य सुशील बुरंगे, सरला बुरंगे, सावित्री बादाडे ओंकार बादाडे मालनबाई अंबुरे, अमर बुरंगे, रोहन शिंनगारे यांनी मोलाचे सहकार्य केले. या सहलीच्या गाडीचे सारथी संजय यादव, केतन सामाले, बाळू चव्हाण हे होते. यांच्यासह जि. प. प्रा.शा. वाघोरा व आदर्श गुरुकुल यांचे मिळून ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## जातीवाचक शिवीगाळ केलेल्या आरोपातून तिघांची सबळ पूराव्याअभावी निर्दोष मुक्तता

माजलगाव । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे दि २५ जुन २०१९ रोजी दुपारी ५:०० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी लक्ष्मण संदिपान कांबळे व आरोपी आसाराम दादाराव खताळ,दत्ता आसाराम खताळ व शिवाजी आसाराम खताळ हे शिवार मौजे चींचाळा येथील शेत गट नंबर २०६ मध्ये असताना वरील आरोपींनी फिर्यादीने लावलेल्या शेतामध्ये बळजबरीने औत घालून पाठाभर शेतात पाळी घालून सरकीचे नुकसान केले व जातीवाचक शिवीगाळ करून परत या शेतात पाय ठेवलास तर तुला जीव मारून टाकू अशी धमकी दिले त्यामुळे लक्ष्मण कांबळे यांनी वडवणी पोलीस ठाण्यात दिनांक २६ जुन २०१९ रोजी फिर्याद दाखल केली त्यानुसार सादर आरोपी विरुद्ध गु.र . न.१०४/२०१९ कलम ५०४,५०६,४२७,३४ भा.द.वी व कलम ३( २) (व्हि.ए) अ.जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल केल्यानंतर



तपासणी अंमलदार यांनी प्रकरणात तपास पूर्ण करून अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे दोषारोप दाखल केले नंतर सरकार पक्षाच्या वतीने पाच साक्षीदार तपासण्यात आले नंतर दोन्ही पक्षाच्यावतीने अंतिम युक्तिवाद होऊन राजेश्री पी.परदेशी,अतिरिक्त सत्र न्यायाधीश माजलगाव यांनी दि ३१ डिसेंबर २०२४ रोजी निकाल जाहीर करून आरोपींची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आरोपीच्या वतीने माजलगाव येथील जेष्ठ विधीज्ञ ड.व्ही.बी.लवटे व ड.एल बी गवते यांनी काम पाहिले त्यांना ड.एस.डी.लंगे ड.व्ही.एन जुजगर यांनी सहकार्य केले

## १०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत विशेष मोहिमेचे आयोजन जाती दावा त्रुटी पडताळणीसाठी प्रस्ताव सादर करावे

**बीड । प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये व्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र अभावी गैरसोय होऊ नये, कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड मार्फत '१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत' विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रमाणपत्र समिती स्तरावरून निर्गमित करण्यासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे

सन २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी १२ विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होऊन जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणांमध्ये समिती स्तरावर प्राथमिक छाननी करून ज्या प्रकरणांमध्ये कागदपत्रे पुराव्या अभावी त्रृटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले असून शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत.

अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनीयमन) अधिनियम २००० मधील कलम ८ अन्वये जाती दावा सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदार यांची असल्याने जाती दावा पडताळणी कामे तात्काळ समितीकडे आपल्या प्रकरणातील त्रुटी पूर्तता करण्यात यावी, जेणेकरून सन २०२४-२५ यापुढील शैक्षणिक वर्षांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यावसायिक पाठ्यक्रमाकरिता राखीव प्रवर्गातून आरक्षित जागेवर प्रवेश घेण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यास प्रवेश प्रक्रिया नोंदणी अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात पडताळणी कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी जाती दावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी आपात्र ठरल्यास याची जबाबदारी अर्जदार उमेदवारांची राहील त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दरम्यान कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी '१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत' त्रुटी पुर्तता विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबिराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा व सन २०२४-२५या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता ११ वी, १२ वी विज्ञान शाखेत प्रवेशित विद्यार्थ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल करावेत, असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

**टी सी हरवला आहे**

**शिलादेवी बापूराव गायकवाड या नावाचा १२वी पास चा टीसी पाली ते बीड बस प्रवासामध्ये हरवला आहे कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधा**

**संपर्क:९५०३०२७७३१**

# आ.अर्जुनराव खोतकर यांच्या नागरी सत्कार सोहळ्यास लोटला जनसागर

## कार्यकर्त्यांनी आता जिल्हा परिषद पंचायत समिती समिती व महानगरपालिकाच्या निवडणुकीच्या तयारीला लागा -आ. खोतकर

जालना । प्रतिनिधी

**आमच्या निवडणुका संपल्या, केंद्र आणि राज्यात महायुतीची सत्ता आहे. आता महानगरपालिका, नगरपालिका ,जिल्हा परिषद, पंचायत समित्या या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून यासाठी आपण गावागावात जाऊन वणवण फिरणार आहोत कार्यकर्त्यांना निवडून आणत मानाचा पटका बांधणार असल्याचा दृढ निर्धार शिवसेना उपनेते, आ. अर्जुनराव खोतकर यांनी आज व्यक्त केला.**

भाग्यनगर परिसरातील दर्शना निवासस्थानासमोर शिवसेना जालना जिल्ह्याच्या वतीने आ.अर्जुनराव खोतकर यांचे अभिष्टचिंतन ,नागरी सत्कार सोहळा बुधवारी ( ता. ०१) धुमधडाक्यात व जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सत्कार उत्तर देतांना आ.खोतकर बोलत होते. आ. हिकमत उढाण,माजी आ.अरविंदराव चव्हाण, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण ,भाजपाचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत , अनिरुद्ध खोतकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर ,ॲड.सुनील किनगांवकर, फेरोजलाला तांबोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले, संतोष मोहिते, संध्याताई देठे, आदींची उपस्थिती होती.

सत्कारास उत्तर देतांना आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले, या कारकिर्दीत सर्वोत्तम कामगिरीची हमी आपण दिली असून सर्व आश्वासने पाळण्याचा प्रयत्न करतोय .गावाच्या विकासासाठी तल्लख, कुशाग्र बुद्धीचे कार्यकर्ते आपल्याला आवडतात असे नमूद करत आ.हिकमत उढाण यांच्याकडे प्रशासनाचा अनुभव असून आमच्या दोघांच्या अनुभवांतून जालना आणि घनसावंगीला थेट जायकवाडीतून वॉटर



ग्रीड चे पाणी मिळवून देणार असल्याचा संकल्प आ. खोतकर यांनी याप्रसंगी व्यक्त केला.जालना शहरात आपण विकासाच्या कामांसाठी ६८ कोटी रुपयांचा निधी आणला असून विकासाचा गाडा पुढे नेण्यासाठी महानगरपालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याकरिता सर्व घटक पक्षांना सोबत घेऊन मिळून- मिसळून काम करण्याची आमची तयारी आहे तथापि राजेश राऊत यांना निर्देश करत तुम्ही तुमच्या नेतृत्वाला कळवा असे आ.खोतकर यांनी सूचविले.यावेळी ॲड. ब्रम्हानंद चव्हाण , राजेश राऊत ,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर ,ॲड.सुनील किनगांवकर, विष्णू पाचफुले, संध्याताई देठे ,कालिंदा ढगे,यांची भाषणे झाली. सुत्रसंचालन इंजि. शुभम टेकाळे यांनी केले तर किरण शिरसाठ यांनी आभार मानले. सोहळ्यास महायुतीचे पदाधिकारी, महिला , युवक, आ.अर्जुनराव खोतकर यांच्या चाहत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**आ. खोतकर यांना अफाट ताकद : आ. उढाण**

आ. अर्जुनराव खोतकर आणि मी एकाच शाळेत शिकत होतो मी अभ्यास करत होतो आणि आ. खोतकर हे समाजाचा अभ्यास करत होते नंतर कळाले त्यांचा सामाजिक अभ्यास प्रचंड आहे. ४० वर्षे राजकारणात टिकून असलेल्या आ. खोतकर यांच्या पाठीशी जनतेची अफाट ताकद आहे असे आ. हिकमत उढाण यांनी याप्रसंगी सांगितले. आपल्याला राजकारणाच्या सुरुवातीच्या काळात आ. खोतकर यांनीच आग्रह धरून उमेदवारी दिली होती अशी आठवण करून देत घनसांगीत रस्ते ,ऊस आणि सिंचनाचा प्रश्न सोडविणार असून पाचही आमदार असताना जिल्ह्यात मंत्री नसल्याबद्दल आ.हिकमत उढाण यांनी खंत व्यक्त केली. यापूर्वी बाहेरच्या पालकमंत्र्यांचा अनुभव बरोबर नाही तेव्हा आता बाहेरचा पालकमंत्री देऊ नये कारण त्यांना इथल्या मातीशी देणे घेणे नाही अशी टिप्पणी आ.उढाण यांनी केली.

**वॉटर ग्रिड योजना पूर्ण करावी : घुगे**

तीस वर्षानंतर पुन्हा जिल्ह्याला विकासाची संधी मिळाली आहे आ.अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शासनाकडे आपण जालना आणि बदनापूर तालुक्यांसाठी वॉटर ग्रीड योजने साठी पाठपुरावा केला. आ. खोतकर यांच्या प्रयत्नांमुळे त्यास अंशतः मंजुरी मिळाली आहे. सदर योजना लवकर सुरू करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी प्रास्ताविकात केली. आ.खोतकर यांना पुढील काळात मंत्री पद मिळेल असे वचन मुख्यमंत्र्यांनी दिले असून कार्यकर्त्यांच्या इच्छा ,अपेक्षा पूर्ण होतील .असा विश्वासही भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केला.

**मोठ्या मनाचे व्यक्तीमत्व : माजी आ. चव्हाण**

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्याचा संकल्प आ.अर्जुनराव खोतकर यांनी दोन दिवसापूर्वीच केला असून सामान्य कार्यकर्त्यांना जपणारे आ.अर्जुनराव खोतकर हे मोठ्या मनाचे व्यक्तिमत्त्व आहे. असे गौरवौद्गार माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी याप्रसंगी काढले. जिल्ह्यात महायुतीच्या आमदारांची मजबूत टीम झाली असल्याने विकासाला गती मिळेल आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्ती होईल असा विश्वास व्यक्त करत सामान्य कार्यकर्ता हीच महायुतीची ताकद असल्याचे अरविंदराव चव्हाण यांनी याप्रसंगी सांगितले.

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांकडून शुभेच्छा!**

शिवसेना उपनेते ,आ.अर्जुनराव खोतकर यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित दादा पवार, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,आ.बबनराव लोणीकर,आ. नारायण कुचे,आ.संतोष दानवे, माजी मंत्री राजेश टोपे , शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री , महायुतीचे आमदार, उद्योजक, व्यापारी, प्रशासनातील अधिकारी, सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आ. खोतकर यांना भेटून तसेच भ्रमणध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. दर्शना निवासस्थानी दिवसभर शुभेच्छा देण्याकरता वर्दळ होती.

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि. २ जानेवारी २०२५ | ६

# रानडुकरांनी केले रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**तालुक्यातील पांगरी येथे रब्बी हंगामात राजमा गहू ज्वारी हरभरा यासह अन्य पिकांचा पेरा करण्यात आलेला आहे.परंतु मागील अनेक दिवसांपासून ही पिके बहरात असताना हरीण रानडुक्कर या जंगली प्राण्यांच्या कडून या रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर सध्या नुकसान सुरू आहे.गावातील गट नंबर ७७ येथे साहेबराव थोरात आणि याच गटातील अन्य शेतकऱ्यानी हरभरा पिकाची पेरणी केलेली आहे.या ठिकाणी रानडुकरांकडून अक्षरशः ही पिके फस्त करत शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान केले आहे.सदरील जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करत नुकसान भरपाई ची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.**




धारूर तालुक्यात यंदा रब्बी हंगामात शेतकऱ्यांकडून राजमा गहू ज्वारी हरभरा यासह अन्य पिकांचा पेरा मोठ्या प्रमाणावर करत पिके जोपासले आहेत.विशेष म्हणजे विजेचा लपंडाव यातून कसरत करत पिकांना पाणी देऊन रब्बी हंगामातील पिके शेतकरी जोपासत आहेत.याच पद्धतीने पांगरी शिवारातील साहेबराव थोरात आणि कुटुंबीयांनी त्यांच्या गट नंबर ७७ या जमिनीत हरभरा पिकाची पेरणी केली होती.पैकी तब्बल पाच ते सहा एक्कर क्षेत्रावरील हरभरा रानडुकरांनी फस्त करत लाखो रुपयांचं नुकसान केल्याचं निदर्शनास येत आहे.रानडुकरांसह हरिण या दोन्ही जंगली प्राण्यांकडून टोळक्याने येऊन रात्री हरभरा पिकाचे प्रचंड नुकसान सुरू आहे.सदरील शेतकऱ्याकडून जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासह झालेल्या पिकाच्या नुकसानीची भरपाई करून देण्याची मागणी केली जात आहे.हीच परिस्थिती गावातील अन्य शेतकऱ्यांची सुद्धा असून गावात हरीण आणि रानडुक्कर या प्राण्यामुळे शेतकऱ्यांचा रब्बी पिकाचे मोठ नुकसान होत असून या जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे.

मागील आठ दिवसापासून रात्री रानडुकरांकडून हरभरा पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान सुरू आहे. हरभरा काढणी अजून पंधरा दिवसाच्या पुढे आहे सध्या शेतात रानडुकरांच्या नुकसानीतून उर्वरित राहिलेल्या हरभरा पिकाची राखण जीव धोक्यात घालून करावी लागत आहे.या हरीण आणि रानडुकरांचा बंदोबस्त शासनाने करावा तसेच झालेल्या नुकसानीच्या भरपाईची मागणी शासनाकडे करत आहोत.

**–साहेबराव थोरात, शेतकरी पांगरी**



छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज व महाराष्ट्र राज्याचे नवनिर्वाचित सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची आज मंत्रालय, मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली. बीड विधानसभा मतदारसंघातील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित प्रलंबित असलेल्या विविध कामांची पूर्तता होण्याबाबत सविस्तर चर्चा केली.




**बीड : मराठी पत्रकार परिषद चे विभागीय समन्वयक सुभाष चौरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतांना ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर, राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय सचिव रवी उबाळे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे समन्वयक अभिमन्यू घरत, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्ध प्रमुख संजय हंगे,संजय शिंदे, सिद्धेश्वर टेलर,मदन जाधव आदींची उपस्थिती होती.**

## बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे किर्तन

**बीड । प्रतिनिधी**

येथील विठ्ठल मंदिर नवजीवन शिक्षक कॉलनी बीड येथे दि.२८ /१२/२४ शनिवार पासून शिवपुराण कथा व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे या कीर्तन महोत्सवामध्ये शिवपुराण कथा व नामवंत महाराज मंडळींची कीर्तन सेवा संपन्न होत आहे या निमित्ताने उद्या दि २ जानेवारी गुरुवारी रात्री ८ ते १० या वेळेत बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे हरिकिर्तन होणार आहे. तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक यांनी केले आहे..



# वडवणी सा.बां. विभागाने नाना तऱ्हेने गुत्तेदार पोसले

## या रस्त्यावर दरवर्षी लाखोंची उधळपट्टी

घाटसावळी प्रतिनिधी

वार्षिक देखभाल दुरुस्तीअंतर्गत पिंपळनेर ते हिवरापहाडी रस्त्यावरील खड्डे बुजविणे आणि साईड पंखे साफ करणे व साईड पंखे भरणे अंदाजे साठ लाखाचा निधी या कामासाठी असून अर्धवटच साईड पंखे साफ करण्यात आले असून रस्त्यावर खड्डे नसतांना देखील फक्त गुत्तेदार पोसण्यासाठी साबा विभाग हा निधी टाकतोय की काय ?असा संतप्त सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे सदरील कामाची चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.



पिंपळनेर घाटसावळी हिवरापाडी रस्त्यावरील खड्डे बुजवणे साईड पंखे साफ करणे व साईड पंखे भरणे अंदाजे साठ लाखाचा निधी ए एम सी अंतर्गत टाकण्यात आला असून काम हे सदरील गुत्तेदाराने अर्धवट केले असून पिंपळनेर ते हिवरापहाडी या २० किमी अंतरावर साठ सुद्धा खड्डे नसतांना इतकामोठा निधी कशासाठी ? फक्त गुत्तेदार पोसून शासनाच्या पैशाची उधळपट्टी करायची का असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात असून या कामाची सखोल चौकशी करून अंदाजपत्रक तयार करणारा जो कोणी अभियंता आहे त्याची खातेनिहाय चौकशी ◀◀ पान ३ वर

# वडवणी पोलिसांची दोन हातभट्टी तर एक जुगार अड्ड्यावर धाड

वडवणी । प्रतिनिधी

नववर्षाची तयारी सर्वत्र केली जात आहे ३१ डिसेंबरला अनेक ठिकाणी अवैधरित्या दारूची जोरदार विक्री दरवर्षीच होत असते तसेच रात्रभर दारू पार्ट्या केल्या जातात त्यामुळे अनेक दारू विक्रेत्यांनी ३१ डिसेंबरला दारू विक्री साठीचे नियोजन करून दारू साठे केलेले आहेत याची माहिती वडवणी पोलिसांना मिळताच वडवणी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी पोलिसांनी ३० डिसेंबर रोजी संध्याकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान वडवणी तालुक्यातील चिंचाळा आणि साळींबा या ठिकाणी धाडी टाकून गावठी दारू हातभट्टी विक्रेत्यावर कारवाई केली असून यामध्ये ७७०० रुपये किमतीची ७७ लिटर हातभट्टी चा साठा पोलिसांनी पकडला आहे चिंचाळा येथे ३७ लिटर हातभट्टी याची किंमत ३७०० रुपये आहे तर साळींबा येथे ४० लिटर हातभट्टी याची किंमत चार हजार रुपये आहे.चिंचाळा आणि साळिंबा येथील दोन दारु विक्रेत्यावर दारूबंदी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच वडवणी शहरांमध्येही एका जुगार अड्ड्यावर धाड टाकण्यात आली असून कल्यान नावाचा मटका चालकावर कारवाई करण्यात आली असून या ठिकाणी २२०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे या कारवाई मध्ये पो.ना.खरात,कप्पे,लटपटे,राऊत, केदार, नाईकवाडे, गवळी, इरमले आणि कवचट यांनी यांनी वरील कारवाई केल्या आहेत पुढील तपास हे वडवणी पोलीस हे करत आहेत.

# दोन हजाराच्या वसुली आरोप म्हणजे आ.सुरेश धस यांच्या बदनामीचे जळजळीत वास्तव

पाटोदा । सतीश गर्जे

आमदार सुरेश धस यांचा सत्कार करावा या उद्देशाने आम्ही सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र शाखा आष्टी, पाटोदा आणि शिरूर तसेच ग्रामसेवक संघटना आष्टी, पाटोदा आणि शिरूर तसेच ग्राम रोजगार सेवक संघटना आष्टी पाटोदा आणि शिरूर यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यासाठी आम्ही पुस्तके खरेदी करून ते गोरगरीब मुलांना वाटण्याचा निर्णय घेतला होता. त्यात आमदार सुरेश धस यांचा कसलाही संबंध नव्हता, असे प्रसिद्धी पत्रक आष्टी तालुका ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष नवनाथ लोंढे यांनी प्रसिद्धीस दिले आहे. पत्रकात म्हटले आहे, आष्टीतून आमदार सुरेश धस हे मोठ्या मताधिक्याने निवडून आले होते. त्यांचा जाहीर सत्काराचा कार्यक्रम आम्ही ठेवला होता. परंतु मस्साजोग येतील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे आरोपी विरुद्ध कठोर कारवाईक होऊन त्यांना शिक्षा मिळाल्याशिवाय फेटा बांधणार नाही असा निश्चय आमदार सुरेश धस यांनी केले असल्यामुळे आम्ही संयोजकांनी असा निर्णय घेतला की सत्काराच्या ऐवजी गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय आणि स्पर्धा परीक्षेचे उपयुक्त असलेले पुस्तके भेट देण्याचं ठरवल्यामुळे आम्ही २००० पुस्तके खरेदी केली आहेत सरपंच, ग्रामसेवक आणि ग्राम रोजगार सेवक यांनी संयुक्तपणे बैठक आयोजित केलेली होती. त्यामुळे आमदार सुरेश धस यांनी या बैठकीद्वारे दोन-दोन हजार रुपये प्रतेक ग्रामसेवकाकडून घेतले हा अपप्रचार असून आमदार सुरेश धस यांची बदनामीची जळजळीत वास्तव आहे.

आमदार सुरेश धस यांची सध्याची लोकप्रियता लक्षात घेऊन काही विघ्न संतोषी मंडळींनी त्यांच्याविरुद्ध कटकारस्थान करून ग्रामसेवक आणि ग्रामरोजगार सेवक यांच्याकडून दोन-दोन हजार रुपये वसूल करण्यात आल्याची बातमी समाज माध्यमांवर पसरण्यात आली. ◀◀ पान ३ वर

# जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन भवनाच्या नवीन वास्तूत कामकाजास केली सुरुवात

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात उभारण्यांत आलेल्या जिल्हा नियोजन भवनाच्या सुसज्ज अशा नवीन ईमारतीत आज दिनांक ०१ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आपल्या कामकाजास सुरुवात केली आहे.**



या प्रसंगी जिल्हाधिकारी यांना नवीन इमारतीत व नववर्षाच्या शुभेच्छा अपर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मेत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, जिल्हा पुरवठा अधिकारी, श्रीमती सविता चौधर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी, शशिकांत हदगल, उप जिल्हाधिकारी भूसपादन (लसीका), श्रीमती सरीता सुत्रावे, उप जिल्हाधिकारी सामान्य प्रशासन, श्रीमती नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी रोहयो, श्रीमती मनिषा दांडगे, जिल्हा नियोजन अधिकारी, सुनिल सुर्यवंशी, तहसिलदार जालना, श्रीमती छाया पवार, तहसिलदार महसूल श्रीमती प्रणाली तायडे, तहसिलदार अंबड, विजय चव्हाण, नायब तहसिलदार गिरगे, इंटीरिअर डिझायनर, श्रीमती रुपम घुगे, यांच्यासह इतर अधिकारी/कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कार्यालयातील सर्व कार्यालयीन ◀◀ पान ३ वर

# केवायसीचे पैसे मागणाऱ्यांवर कारवाई करून तारीख वाढवा- खुर्शीद आलम

## खासदार सोनवणेसह जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

आज ३१ डिसेंबर रोजी मा. खासदार बजरंग सोनवणे साहेब आणि मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या कडे एका शिष्टमंडळाने केवायसी ची तारीख वाढवुन देणे आणि केवायसी साठी पैसे मागणाऱ्या राशन दुकानदारावर कारवाई करणेची मागणी केली आहे, निवेदनात म्हटले आहे की शासन ◀◀ पान ३ वर



# बीड ते पुणे १३ शिवाई बस सुरु; मराठी पत्रकार परिषदेच्या प्रयत्नांना

बीड । प्रतिनिधी

बीड ते पुणे जादा गाड्या सोडाव्यात यासाठी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने विभागीय नियंत्रकाकडे विनंती करणारे निवेदन देण्यात आले होते. या निवेदनाला मान देऊन विभागीय नियंत्रक श्रीमती दुसाने यांनी आदेश देत बीड ते पुणे ११ शिवाई इलेक्ट्रिक गाड्या सुरू केल्या. यातील नऊ गाड्या बीड ते वाकडेवाडी( शिवाजीनगर) तर दोन गाड्या बीड ते स्वारगेट अशा सुरू करण्यात आल्या. बीड ते पुणे जाणाऱ्या गाड्या सकाळी ६.००,७.०० (अमळनेर मार्गे )७.४५, ९.००, ११.००,दुपारी २. ३० ,४.००,रात्री १०.००(जामखेड मार्गे),रात्री ११.०० जाणाऱ्या सर्व गाड्या पाथर्डी मार्गेजातील. याबरोबरच पुणे येथूनही सकाळी ६.०० (पाथर्डी मार्गे ),७.००([illegible] मार्गे ),१०.००वाजता ([illegible]ड मार्गे) ११.०० वाजता ([illegible] मार्गे),दुपारी ४ वाजता (पाथर्डी मार्गे),५.०० (पाथर्डी मार्गे) ५.०० वाजता (जामखेड मार्गे)सायंकाळी ६ वाजता (पाथर्डी मार्गे)रात्री १०.००वाजता (जामखेड मार्गे)रात्री ११.००वाजता (पाथर्डी मार्गे )गाड्या बीडकडे येतील. याशिवाय बीड ते स्वारगेट सकाळी ६.१५ वाजता व दुपारी २.०० वाजता जामखेड –दौंड मार्गे जातील. याचवेळी स्वारगेट वरून सकाळी ७.३० वाजता दुपारी ४.०० वाजता याच मार्गे या गाड्या परत येतील. बीड विभागीय नियंत्रकांनी आणखी गाड्या सुरू केल्या असून बीड ते परळी सकाळी ७.०० वाजता




सकाळी८.०० वाजता दुपारी २.००वाजता ३.०० वाजता व ४.०० वाजता अशा गाड्या सुटतील. तर परळीहून बीड कडे येणाऱ्या गाड्या सकाळी ९.३० वाजता,११.३० वाजता, दुपारी ४.३० वाजता दुपारी ५.३० वाजता या गाड्या सुटतील .याशिवाय बीड ते माजलगाव सकाळी ६. ३०, १०.०० वाजता, ११:३० वाजता दुपारी १.०० वाजता, ३.०० वाजता, ४.३०वाजता व सायंकाळी ६.३० वाजता या गाड्या बीड वरून जातील तर माजलगाव वरून सकाळी ६:३० वाजता, ८.०० वाजता ,१०.०० वाजता, ११.३० वाजता दुपारी १.०० वाजता ,३.००, वाजता,४.३० वाजता व सायंकाळी ६.०० वाजता या गाड्या बीडकडे येतील याशिवाय बीड ते जालना सकाळी ६.०० वाजता आणि जालना ते बीड ९.०० वाजता या गाड्या सुटतील याशिवाय बीड ते लातूर सकाळी ६.०० वाजता आणि दुपारी १.०० वाजता लातूरला जातील तर लातूर वरून ९.३० वाजता व दुपारी ५.०० वाजता बीड कडे येतील याशिवाय बीड कडून सोलापूर कडे जाणाऱ्या गाड्या सकाळी ७.०० वाजता, ९.०० वाजता १०.०० वाजता ११.०० वाजता, दुपारी२.०० वाजता ३.०० वाजता, ५.०० वाजता, सायंकाळी ६.०० वाजता व ७.०० वाजता सोलापूर कडे जातील तर सोलापूर कडून बीड कडे येणाऱ्या गाड्या सकाळी ६.३०वाजता,७.००,८.००,९.००,१०.००, दुपारी ३.००,४.००,५.००, व सायंकाळी ६.०० ◀◀ पान ३ वर

# अभिवादन बाईक रॅलीस युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – गणेश जाधव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील महात्मा फुले सेवा संघाच्या वतीने ३ जानेवारी रोजी ज्ञानज्योति सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शहरातून अभिवादन बाईक रॅली काढण्यात येणार आहे. तरी फुले दांम्पत्य प्रेमींनी या अभिवादन रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अभिवादन बाईक रॅलीचे समन्वयक गणेश दादा जाधव यांनी केले आहे.

अभिवादन बाईक रॅलीची सुरूवात ही कै.गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या शाळेच्या ज्ञानज्योति सावित्रीमाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळयास अभिवादन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक – भारतरत्न ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# २०७ व्या शौर्य दिनानिमित्त भीमा कोरेगाव येथे मोठ्या प्रमाणात भीम अनुयायी उपस्थित !

**पुणे । प्रतिनिधी**

२०७ व्या सूर्य दिनानिमित्त विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी राज्यातून सात ते आठ लाख भीम अनुयायी मोठ्या प्रमाणात दाखल झाले होते. मंगळवारच्या रात्रीपासून मोठ्या संख्येने या ठिकाणी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या आज जवळपास सात ते आठ लाख नागरिक या ठिकाणी आले होते. शौर्य दिना विषयी भीम अनुयायांच्या मनात विजयाची भावना निर्माण होते. त्यामुळे नागरिक या ठिकाणी सालाबाद प्रमाणे याही वर्षी मोठ्या संख्येने उपस्थित झाले आहेत. बंदोबस्तासाठी जवळपास दहा ते बारा हजार पोलीस या ठिकाणी आले आहेत. तसेच पुणे नगर मार्गावरील वाहतूक देखील वळवण्यात आली आहे .येथे येण्यासाठी प्रशासनातर्फे विजयस्तंभ सुविधा हे प विकसित करण्यात आले होते. कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी ३१ डिसेंबर पासून मोठ्या प्रमाणात नागरिक कोरेगाव भीमा येथे पेरणा फाटा या ठिकाणी जमले होते. आज सकाळपासून या ठिकाणी भीम अनुयायी येईल येत असून विजयस्तंभ जवळ मोठी गर्दी झाली आहे. या ठिकाणी देश व राज्यातून लाखो आणूया येत असल्याने गेल्या काही वर्षापासून येथे येणाऱ्या अनुयायांच्या संख्येत वाढ झाली आहे. यावर्षी दहा लाख अनुयायी येणार आहे. असल्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने तयारी केली होती. मोफत बस सेवा व पिण्याचे पाणी आरोग्याच्या सुविधा पोलीस मदत कक्ष, वाहन स्थळ, हिरकणी कक्ष ,ज्येष्ठ नागरिकांसाठी निवारा कक्ष, स्वच्छतेची सुविधा, या परिसरात उभारण्यात आले. यावर लक्ष ठेवण्यासाठी विशेष अधिकारी व १७ समन्वयक अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. रात्रीपासून अनुयायी येण्यास



सुरुवात झाली होती.

कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या पूर्वसंध्येला मंगळवारी ३१ डिसेंबर रात्री पेरणा फाटा येत पासून विजयस्तंभ परिसरात अनुयायी येण्यास सुरुवात झाली आहे. प्रेरणा फाटा परिसरात मोठ्या प्रमाणात अनुयायी हातात झेंडे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा घेऊन कोरेगाव भिमाच्या दिशेने जात असून हा परिसर घोषणांनी दुमदुमून गेला आहे. वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांनी देखील अभिवादन केले आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज विजय स्तंभ येथे येऊन अभिवादन केले आहे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गट पक्षाचे नेते तथा मंत्री दत्ता भरणे यांनी विजय स्तंभाला अभिवादन केले.

यावेळी प्रकाश आंबेडकर म्हणाले...... दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभाला अभिवादन करण्यासाठी आलो असून. भीमा कोरेगावचा जो संघर्ष आहे. तो शारीरिक रित्या संपला असला तरी मानसिक रित्या अजून सुरू आहे. देशात जोपर्यंत हा मानसिक संघर्ष सुरू आहे. तोपर्यंत मानवतेच्या दृष्टिकोनातून जे जे स्तंभ आहेत. त्या विजय स्तंभाला लोक अभिवादन करण्यासाठी येत राहतील असा. प्रकाश आंबेडकर म्हणाले.

# नूतन वर्षानिमित्त आळंदी मध्ये भाविकांची गर्दी

**आळंदी । प्रतिनिधी**

नवीन वर्षाची सुरुवात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी दर्शन घेण्यासाठी भाविक तीर्थक्षेत्र आळंदी मध्ये मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. आज अभिषेक करण्यासाठी लांब लांब रांगा लागल्या होत्या. पहाटेपासून माऊलीच्या दर्शनासाठी मंदिरात गर्दी दिसून येत आहे. भाविक रांगेमध्ये उभे राहून ज्ञानोबा माऊली तुकाराम एकनाथ ज्ञानदेव तुकाराम असा जे घोष करत परमात्मा विठुरायाचे स्मरण करत दर्शन घेत होते. नवीन वर्षाची सुरुवात आठवण म्हणून मंदिरात काही भाविक मोबाईल मध्ये छायाचित्र काढण्यात मग्न होते. तसेच इंद्रायणी घाटावर भाविकांची गर्दी दिसून येत होती. नूतन वर्षानिमित्त सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेक नागरिक एकमेकांना शुभेच्छा देत होते. आणि नवीन संकल्प करून आपल्या धकाधकीच्या जीवनात नवीन वर्षाची सुरुवात चांगली हो अशी माऊलीच्या चरणी प्रार्थना करत होते.




# पुण्यात पाच माजी नगरसेवक भाजपच्या वाटेवर?

पुणे । प्रतिनिधी

नव्या वर्षाच्या सुरूवातीलाच पुण्यात राजकीय भूकंपाची चिन्हे आहेत. एका राजकीय पक्षाचे पाच माजी नगरसेवक भाजप मध्ये प्रवेश करणार असून या नगरसेवकांनी नुकतीच पुण्यातील एका मोठया राजकीय नेत्यासोबत भाजपच्या राज्यातील नेत्यांची मुंबईत जावून भेट घेतली आहे. त्यानंतर लवकरच हे नगरसेवक मुंबई अथवा पुण्यात भाजप मध्ये प्रवेश करणार आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणूकांच्या पाठोपाठ राज्यात पुढील काही महिन्यात राज्यात रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होण्याची शक्यता आहे. त्यातच, राज्यात लोकसभा निवडणूकीत पिछेहाट झालेल्या भाजपला विधानसभा



निवडणूकीत मतदारांनी पसंती दिली असून पुण्यातही भाजपला शत प्रतिशत यश मिळाले असून भाजपच्या सर्व जागा निवडून आलेल्या आहेत.

त्यामुळे, २०१७ मध्ये महापालिकेवर निर्विवाद यश मिळालेल्या भाजपची सत्ता महापालिकेतही कायम राहण्याची शक्यता असल्याने या बडया राजकीय पक्षाच्या नगरसेवकांनी धसका घेतला असून भाजपमध्ये जाण्याची तयारी दर्शविली आहे. त्यासाठी, या पाच नगरसेवकांनी नुकतीच मुंबई वारी केली असून त्यांना पक्षात पद देण्यासह, महापालिका निवडणूकीचे तिकिटही देण्याची तयारी भाजपकडून दर्शविण्यात आली आहे.

त्यामुळे, महापालिका निवडणूकीत भाजप विरोधात लढण्यापेक्षा त्यांच्या सोबत जाण्याची भूमिका या माजी नगरसेवकांनी घेत भाजपची वाट धरली असून पुढील काही दिवसात ते भाजपमध्ये जाहीर प्रवेश करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. यात काही विधानसभेसाठी इच्छूक असलेल्या माजी नगरसेवकांचाही समावेश असून दोन महिला तर तीन पुरूष माजी नगरसेवकांचा समावेश आहे.

# पिंपरी : बंदोबस्तावरून घरी जाताना काळाचा घाला ; पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू

पिंपरी - वर्षाखेरीस दिवस-रात्र बंदोबस्त करून पहाटे घरी जात असताना एका पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू झाला. ही घटना बुधवारी (दि. १ जानेवारी) पहाटे महाळुंगे येथे घडली. जितेंद्र गिरनार असे मृत्यू झालेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जितेंद्र गिरनार हे महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेमणुकीस होते. वर्षाखेरीस ते दिवस-रात्र बंदोबस्तासाठी तैनात होते. बुधवारी पहाटे बंदोबस्त संपवून ते घरी जात होते. महिंद्रा कंपनी जवळ आले असता त्यांच्यासमोर एक कंटेनर जात होता. गिरनार यांच्या क्रेटा कारची कंटेनरला पाठीमागून धडक बसली. या अपघातात पोलीस उपनिरीक्षक गिरनार गंभीर जखमी झाले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र गिरनार मागील काही वर्षांपासून पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत आहेत. पूर्वी





ते वाकड पोलीस ठाण्यात नेमणुकीस होते. त्यानंतर मागील काही महिन्यांपूर्वी त्यांची महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली झाली होती. वर्षाच्या सुरुवातीलाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. गिरनार यांचे अपघाती निधन झाले.

### दिघीत महिलेचा मृत्यू

दिघी येथील साई मंदिर समोर मॉर्निंग वॉक करत असलेल्या महिलेला एका वाहनाने धडक दिली. यामध्ये महिलेचा मृत्यू झाला आहे. ही घटना बुधवारी (दि. १ जानेवारी) सकाळी घडली.

# महावितरण बारामती परिमंडलाच्या मुख्य अभियंता पदी धर्मराज पेठकर यांची नियुक्ती

बारामती । प्रतिनिधी

महावितरण बारामती परिमंडलाचे ८ वे मुख्य अभियंता म्हणून धर्मराज पेठकर यांनी बुधवारी पदभार स्विकारला असून, नवीन वर्षात बारामतीला नवीन अभियंता मिळाल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले आहे.

मुळचे लातूर जिल्ह्यातील असलेले धर्मराज पेठकर यांनी तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात १९९४ साली कनिष्ठ अभियंता म्हणून वीज क्षेत्रातील सेवेला सुरुवात केली. २००६ साली ते कार्यकारी अभियंता झाले. भांडुप, ठाणे, कल्याण, निलंगा, सांघिक कार्यालय, पुणे व सातारा येथे त्यांनी कार्यकारी अभियंता म्हणून जबाबदारी



सांभाळली.

२०१७ मध्ये ते अधीक्षक अभियंता पदी कल्याण, पुणे व कोकण प्रादेशिक विभागात तर २०२० पासून २०२४ पर्यंत त्यांनी सांगली मंडलचे अधीक्षक अभियंता म्हणून काम केले आहे. डिसेंबरच्या अखेरीस सांघिक कार्यालयाने पेठकर यांची पदोन्नतीवर बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून पदस्थापना केली होती. त्यानुषंगाने नूतन वर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मुख्य अभियंता पदाचा पदभार स्विकारला व कामाला सुरुवात केली. कर्तव्यनिष्ठ, ग्राहकाभिमुख तसेच कर्मचाऱ्यांप्रती प्रेमळ असलेले अभियंता म्हणून पेठकर यांची ओळख आहे.

टीमवर्कने काम करु - धर्मराज पेठकर

पदभार स्विकारताच नूतन मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी बारामती परिमंडलातील वरिष्ठ अभियंते व अधिकाऱ्यांची बैठक घेतली. ते म्हणाले, आपण सर्व जण एक टीम म्हणून काम करु व आपल्याला वेळोवेळी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करु. विजेची हानी कमी करणे व वसुलीत बारामती नंबर एकवर ठेवणे हेच माझे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले.

# चार विशेष रेल्वेगाड्यांना मुदतवाढ

**पुणे । प्रतिनिधी**

प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, प्रवाशांना सुखकर आणि सुरक्षित प्रवास मिळावा आणि स्थानकावर होणारी गर्दी कमी



करण्यासाठी मध्य रेल्वेकडून पुणे विभागातून दौंड-सोलापूर आणि पुणे-हरंगुळ, पुणे-कोल्हापूर दरम्यान धावणाऱ्या विशेष ट्रेनला मुदतवाढ देण्यात आली आहे.

पुणे-हरंगुळ-पुणे दैनंदिन धावणारी विशेष गाडी आता दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत धावणार आहे. सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी दि. २५ मार्च २०२५ तर लोकमान्य टिळक टर्मिनस-सोलापूर साप्ताहिक विशेष गाडी दि. २६ मार्च २०२५ पर्यंत धावणार आहे.

पुणे-कोल्हापूर-पुणे दरम्यान दैनंदिन धावणारी विशेष गाडी दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत धावणार आहे तर दौंड-सोलापूर-दौंड डेमू अनारक्षित विशेष गाडीचा कालावधी दि.३१ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आले आहे.

सोलापूर - दौंड दैनंदिन डेमूचा कालावधीही दि. ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. वरील सर्व गाड्यांचे दिवस, वेळ, रचना आणि थांबे यामध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

# आदिवासी बांधवांना लोकोपयोगी साहित्य वाटप

खालापूर । प्रतिनिधी

भाजप उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सनी यादव यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपली आहे. त्यांनी ग्रामपंचायत दूरशेत हद्दीतील तुरमाळ व देवन्हावे गावातील आदिवासी बांधवांना लोकोपयोगी साहित्य वाटप केले.

यावेळी विधानसभा संपर्कप्रमुख प्रल्हाद केणी, तालुका सरचिटणीस रवींद्र पाटील, वाहतूक सेल तालुका अध्यक्ष हरिभाऊ जाधव, खालापूर शहराध्यक्ष दीपक जगताप, मोहन घाडगे, निलेश साळुंखे, पांडुरंग पाटील, ज्ञानेश्वर पांगारे, राहुल कडव, कुणाल शिंदे, शुभम सकपाळ आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

ज्या समाजात आपण जन्म घेतो त्या समाजाचं काहीतरी देणं लागतो, या भावनेतून



गेल्या अनेक वर्षापासून मी समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. या कार्यातून गरजूंना मदतीचा हात मिळत असल्याने त्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला मिळतो. यामुळे मला सामाजिक कार्य करण्यास ऊर्जा मिळत असून यापुढेही जेवढे शक्य होईल, तेवढे सामाजिक कार्य करत राहण्यास मी कटीबद्ध आहे.

- सनी यादव, रायगड जिल्हा उपाध्यक्ष, भाजप

भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष तथा खालापुर तालुका प्रभारी अध्यक्ष सनी यादव हे सामाजिक क्षेत्रात काम करत असताना गरजूना मदतीचा हात देतात. त्यांनी आपल्या वाढदिवस दिनी समाजोपयोगी कार्यक्रम राबविला. त्यांनी अनेक गरजूंना मदत केली. तसेच दरवर्षी वर्षभर पुरेल एवढे शैक्षणिक साहित्य वह्या, दफ्तर, शालोपयोगी साहित्य देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# पुणे स्टेशनवरुन कुंभमेळ्यासाठी विशेष रेल्वे सेवा




**पुणे । प्रतिनिधी**

उत्तरप्रदेश राज्यातील प्रयागराज येथे जानेवारीत कुंभमेळा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यासाठी देशातून तसेच परदेशातून मोठ्या संख्येने भाविक प्रयागराज येथे दाखल होणार आहेत. महाराष्ट्रातून देखील मोठ्या संख्येने भाविक प्रयागराजला जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर भाविकांचा कल पाहता रेल्वे विभागाच्या इंडियन रेल्वे केटरिंग अॅन्ड टुरिझम कॉर्पोरेशनकडून 'भारत गौरव' या विशेष रेल्वेचे आयोजन करण्यात आले आहे. पुणे रेल्वे स्टेशनवरून १५ जानेवारी या दिवशी रात्री १० वाजता ही विशेष रेल्वे उत्तर प्रदेश येथील प्रयागराजच्या दिशेने रवाना होणार आहे. केंद्र सरकारच्या 'देखो अपना देश' या योजनेअंतर्गत 'भारत गौरव' ही विशेष रेल्वे सेवा सुरू करण्यात आली असल्याची माहिती रेल्वे विभागाच्या वतीने देण्यात आली.

पुणे, वाराणसी, प्रयागराज, अयोध्या आणि पुन्हा पुणे असा मार्ग निश्चित करण्यात आला असल्याची माहिती रेल्वे विभागने दिली आहे. या सात दिवसांच्या प्रवासात रेल्वेकडून विविध सुविधा प्रवाशांना देण्यात येणार आहे. तसेच या रेल्वेत प्रवाशांना सुरक्षारक्षक, सीसीटीव्ही, जेवण व्यवस्था पुरवण्यात येणार आहे. वाराणसी, प्रयागराज आणि अयोध्या या ठिकाणी उतरल्यानंतर तिथे त्यांची राहण्यासाठीची विशेष सुविधा देखील करण्यात येणार आहे.

पुणे आणि ग्रामीण भागातील प्रवाशांच्या दृष्टीने नियोजन

रेल्वे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, या योजनेअंतर्गत आतापर्यंत ८६ रेल्वे विविध मार्गांवरून धावल्या आहेत. विशेष म्हणजे धार्मिक सोहळ्याच्या अनुषंगाने या गाड्यांचे प्रमाण अधिक आहे. या योजनमुळे धार्मिक स्थळांबरोबर पर्यटनाचा लाभ प्रवाशांना घेता येत आहे. प्रयागराज येथील कुंभमेळाचे पर्व सुरू होत असून, पुणे आणि जिल्हा तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांच्या दृष्टीने या विशेष रेल्वे गाडीचे आयोजन करण्यात आले आहे.


# पुण्याच्या पर्यटकाचा काशीदच्या समुद्र किनारी बुडून मृत्यू

**मुरुड । प्रतिनिधी**

काशीद समुद्र किनारी पोहताना प्रतिक प्रकाश सहस्त्रबुद्धे या ३१ वर्षीय तरुणाचा बुडून मृत्यू झाला. ही घटना जैनवाडी जनता वसाहत, साईबाबा मंदिराजवळ घडली. पर्यटक सहस्त्रबुद्धे मित्रांसह पुण्याहून काशीदला आला होता. ही आठवड्यातील दुसरी घटना असल्याने पुन्हा एकदा पर्यटकांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

ई विभागातील बांधकाम प्रकल्पांवर निर्बंध

मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथील पर्यटक काल थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी भाड्याने रिक्षा घेऊन प्रतिक प्रकाश सहस्त्रबुद्धे, गणेश नितिन सहस्त्रबुद्धे, रिक्षा चालक -शदाब अविद मलीक, राकेश राजु पवार हे चौघे मित्र फिरण्यासाठी आले होते. दुपारच्या दरम्यान चौघे मित्र समुद्राच्या पाण्यात पोहण्यास उतरले होते. पोहुन झाल्यानंतर स्पोर्ट बाईकवर फिरु असा बेत ठरला त्याकरिता आपल्या गाडीतुन पैसे आणण्याकरिता बाहेर आले आणि प्रतिक सहस्त्रबुद्धे हा पाण्यात पोहत राहिला. तिघांना वाटलं की प्रतिक ही पाण्यातुन



बाहेर आला असेल आणि कुठे तरी फिरत असेल. दिड तासानंतर प्रतिक सहस्त्रबुद्धे हा पाण्यात तरंगताना लाईफ गार्ड यांना दिसला ताबडतोब घटनास्थळी असलेले पोलिस व लाईफ गार्ड समुद्राच्या पाण्यात उतरून प्रतिक सहस्त्रबुद्धे यांना बाहेर काढले. परंतु, प्रतिक हा प्रतिसाद देत नसल्याने त्यास पोलिसांनी ताबडतोब मुरुड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. प्रतिक सहस्त्रबुद्धे हे आधीच मयत झाले आहेत असे डॉक्टर यांनी सांगितले. ही माहिती मिळताच मुरुड पोलिस निरीक्षक नामदेव बंडगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक देशमुख व पोलीस हवालदार -हरि मेंगाळ घटनास्थळी दाखल झाले. या संदर्भात मुरुड पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास मुरुड ठाण्याचे पोलीस हवालदार- हरि मेंगाळ हे करीत आहेत.